१८३८
म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं. ७५३

REFBK-0005425

७७८२

[illegible]
२५/१०/३८

# म री चि का



REFBK-0005425

—शशाङ्क

## साहित्य-सरोज-मण्डळ

अनन्त यशवन्त देशपाण्डे

दत्त गोविन्द बोपर्डीकर

श्रीधर गणेश दाढे

बालकृष्ण मार्तण्ड दाभाडे



**किम्मत १ रुपाया.**

प्रकाशन-भाद्रपद वद्य ७ शके १८५८

**प्रकाशक**

बालकृष्ण मार्तण्ड दाभाडे

औन्ध ( जि० सातारा. )

**मुद्रक**

श्री० दा० सातवळेकर,

भारतमुद्रणालय, औन्ध (जि०सातारा)

# प्रस्तावना

श्री० शशाङ्क यांनी प्रस्तुत गद्यगीत–संग्रह प्रस्तावना लिहिण्याकरिता म्हणून जेव्हा माझ्यासमोर ठेवला, तेव्हा एक प्रकारच्या अपूर्व कुतूहलाने मी तो पाहिल्यापासून शेवटपर्यंत वाचून पाहिला. मला कुतूहल वाटावयाचें कारण हेंच की, ‘ गद्यगीत ’ हा एक नवीनच वाङ्मयप्रकार मराठींत रूढ होऊं पहात आहे. श्री० शशाङ्क आणि कराचीचे श्री० शङ्कर साठे या दोन लेखकांखेरीज या प्रकाराचे मराठींत आणखी कुणी पुरस्कर्ते आहेत किंवा नाहीत, हें निदान मला तरी माहीत नाही. भावगीत, लघुकथा, सुनीत इत्यादि मराठींत रूढ झालेल्या नवीन वाङ्मयप्रकारांप्रमाणेच ‘ गद्य-गीत ’ हा प्रकार आहे तरी काय, याचीं अंगोपांगें कशीं असावीं, उत्कृष्ट गद्यगीताची कसोटी काय, इत्यादि प्रश्नांचा उलगडा अजून कुणीच केलेला नाही.

भावगीत, लघुकथा, सुनीत इत्यादि प्रकार युरोपांतून मराठींत आले आणि या प्रकारांच्या स्वरूपाचा युरोपियन वाङ्मयांत भरपूर उहापोह झालेला असल्यामुळे मराठींतही त्यांच्या सर्वसाधारण स्वरूपाविषयी संशयित परिस्थिति राहिलेली नाही. गद्यगीताची स्थिति तशी नाही. हा प्रकार युरोप-मधून इथे आलेला नाही. तेव्हा गद्यगीताच्या स्वरूपाची चर्चा जर करावयाची असेल, तर ती स्वतंत्रपणें करावी लागेल आणि हा प्रकार मराठींत जर अधिकाधिक रूढ होत गेला, तर माझ्यापेक्षा अधिक अधिकारी असलेले विद्वान् आणि व्यासंगी टीकाकार त्याची विस्तृत चर्चा करतीलच. तोंपर्यंत श्री० शशाङ्कांच्या ‘ मरीचिका ’ वाचल्यानंतर सर्वसाधारण ‘ गद्यगीत ’ या वाङ्मयप्रकारासंबंधी आणि त्यांतल्या त्यांत ‘ मरीचिके ’ विषयी माझ्या मनांत जे विचार आले, ते जसेच्या तसे पुढे मांडण्याचा माझा विचार आहे.

हेतु इतकाच की, वर उल्लेखिलेल्या विस्तृत व सांगोपांग चर्चेला त्यामुळे थोडी-बहुत का होईना, पण चालना मिळावी.

पहिल्यांदाच मला एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. गद्यगीतांना मी निर्भेळ काव्य म्हणावयाला कबूल नाहीं. माझा हा सनातनीपणा पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटेल; पण त्याला कारणें आहेत. गद्यकाव्य (Prose-Poetry) किंवा काव्यमय गद्य ( Poetic Prose ) असे वाक्प्रचार रूढ आहेत; पण वाक्प्रचार यापलीकडे त्यांना महत्त्व नाही. काव्य ( Poetry ) आणि गद्य ( Prose ) हे जे वाङ्मयाचे अनादि कालापासून दोन ढोबळ भाग पडले आहेत, ते सकारण आहेत, असें मला वाटतें. अर्थात् नुसती छन्दोमय रचना म्हणजे काव्य नव्हे अथवा एखादी गोष्ट केवळ शार्दूलविक्रीडितांत किंवा मुक्त छंदांत सांगितली आहे, म्हणून तीच गोष्ट कुणी उत्कृष्ट गद्यांत सांगितली असेल, तर वाङ्मयदृष्ट्या ती छंदोमय गोष्टच अधिक श्रेष्ठ ठरेल, असें माझें मुळीच म्हणणें नाही. गद्यापेक्षा काव्य श्रेष्ठ किंवा काव्यापेक्षा गद्य श्रेष्ठ, हें ठरविण्याचा माझा उद्देश नाही. माझ्या म्हणण्याचा इत्यर्थ हाच की, निर्भेळ काव्य छंदोमय स्वरूपच धारण करतें आणि म्हणूनच काव्य हा शब्द उच्चारल्याबरोबर सामान्य माणसाच्या डोळ्यासमोर छंदोमय रचनेचें जें चित्र उभें रहातें, तें रास्तच होय.

काव्याच्या छंदोमय रचनेवर मी जो हा भर देत आहें, त्यांत माझा हेतु काव्य म्हणजे छंदोमय रचना अशी व्याख्या करण्याचा किंवा काव्याचें स्थूल किंवा सूक्ष्म स्वरूप ठरविण्याचा नाही. पुराणकालांतल्या संस्कृत वाग्भटांपासून तों विसाव्या शतकांतल्या अद्यावत् युरोपियन टीकाकारांपर्यंत सर्वांनी तें ठरविण्याचा प्रयत्न करून ' नेति ' ' नेति ' म्हणून हात टेकले आहेत. तेव्हा त्या प्रांतांत मी शिरूंच इच्छीत नाहीं. काव्यांतील छंदाचें महत्त्व वर्णन करतांना टॉल्स्टॉय्चें एक वाक्य माझ्या डोळयासमोर आहे.

टॉल्स्टॉय म्हणतो— " There is nothing that cannot be said in prose." जें गद्यांत सांगतां येणार नाही, असें कांहीच नाही. मला वाटतें टॉल्स्टॉय्‌चा काव्यावर कटाक्ष आहे. त्याचें म्हणणें असें की, तुम्ही जें जें कांही काव्यांतून सांगतां, तें तें सर्व आम्ही गद्यांतून सांगू शकतों. मग तुमची ती छंदाची भानगड विनाकारण हवी कशाला? गद्याच्या बाजूने काव्यावर हा हल्ला चढवितांना आपण एक अत्यंत तर्कदुष्ट विधान करीत आहोंत, हें टॉल्स्टॉय्‌च्या लक्षांत आलेलें दिसत नाही.

कुणीही काव्यभक्त काव्याची बाजू मांडतांना असें मुळीच म्हणत नाही की, गद्यांत जें सांगतां येत नाही, तें आम्ही काव्यातून सांगतों, किंवा काव्यांतून आम्ही जें सांगतों, तें गद्यांतून सांगतांच येणार नाही. काव्यांतला आणि गद्यांतला फरक '**काय**' सांगावयाचें यांत नसून, तें '**कसें**' सांगितलें जातें, यांत आहे; आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, वाङ्मयनिर्मात्यापुढे गद्यभाषा आणि छंदोरचना असे दोन नमुने पडलेले असतात आणि कोणती-ही गोष्ट सांगावयाची असली की, ती सांगण्याकरिता हा किंवा तो नमुना तो शांतपणें माध्यम म्हणून निवडतो, अशी परिस्थिति नसते. मुद्दामच एक पौराणिक उदाहरण घेऊन ही गोष्ट मी अधिक विशद करतों.

काव्याचा जन्म अवनीतलावर कसा झाला, यासंबंधीं जी अद्भुतरम्य कथा पुराणांत आहे, ती अत्यंत अर्थपूर्ण आणि प्रतीकात्मक आहे, असें मला वाटतें. स्वैरपणें विहार करणाऱ्या एका क्रौञ्चमिथुनावर शरसंधान करून एका निषादाने त्याला घायाळ केलें. तें हृदयविदारक दृश्य वाल्मीकी मुनींच्या दृष्टीला पडलें आणि अन्तःकरण कळवळून सन्तापाने "**मा निषाद**......" ही त्वेषयुक्त शापवाणी अनुष्टुभ् छंदांत त्या क्षणीं त्यांच्या मुखांतून अवतीर्ण झाली. हें जगांतलें पहिलें काव्य, अनुष्टुभ् हा पहिला छंद आणि वाल्मीकी हे आद्य कवि. वाल्मीकींना तो शाप काय गद्यांत देतां आला नसता? पण तो शाप गद्यांत द्यावा कीं पद्यांत द्यावा, हा प्रश्न नव्हता. तें क्रूर कृत्य पाहून

अनन्यसाधारण दया आणि क्रोध या उत्कट विकारांनी विकल झालेल्या आद्य कवींच्या मुखांतून बाहेर पडलेल्या शापवाणीने छंदोमय रूप धारण केलें.

थंड लोखंडाचा तुकडा आणि भट्टींत घातलेल्या लोखंडाचा प्रवाह करून वाहणारा लाल लाल तप्त रस, यांत जो फरक तोच गद्यवाङ्मयरूपाने दिसणाऱ्या मानवी जीवनाच्या विशिष्ट खंडांत आणि कविमनांत पेटलेल्या भावनांच्या भट्टींत तप्त झाल्यामुळे छंदोमय प्रवाह करून वाहणाऱ्या काव्यरूप जीवनखंडांत. लोहखंडाच्या तप्त-रसाला तो प्रवाह जितका नैसर्गिक तितकीच त्या विशिष्ट वाङ्मयाला छंदोमय रचना स्वाभाविक. कलावंत आपलें हृद्गत गद्यमय भाषेंत किंवा छंदोमय रचनेंत कसेंही व्यक्त करतो; पण केव्हा केव्हा त्याच्या भावना उत्कटत्वाच्या इतक्या भराला पोहोचतात की, त्या व्यक्त करण्याचा तो प्रयत्न करूं लागला, म्हणजे स्वतः होऊनच त्या छंदोमय रूप धारण करतात. काव्याची आणि उत्कटत्वाची सामान्य माणसाकडून कळत अगर न कळत जी सांगड घातली जाते, ती यामुळेच.

कोणत्याही गद्य वाङ्मयांत सुद्धा एखादा भाग अत्यंत उत्कट भावनांनी युक्त असा वाटूं लागला कीं, 'किती काव्यमय आहे हें !' असे उद्गार आपल्या तोंडांतून नकळत बाहेर पडतात. उत्कटत्वाने रसरसलेला हा भाग जर जरा अधिक सूक्ष्म दृष्टीने आपण अभ्यासला, तर त्यांत एक प्रकारची नादमधुर तालबद्धताही आपणाला आढळून येईल. काव्याप्रमाणेच उत्कृष्ट गद्यांतही सूक्ष्म स्वरूपांत कां होईना, पण एक तालबद्धता ( Rhythm ) असते. डिकन्सच्या 'Old Curiosity Shop' या कादंबरींत ज्या प्रकरणांत त्याने नायिकेच्या- छोट्या नेलच्या-मृत्यूचें वर्णन केलें आहे, त्या प्रकरणांतलें गद्य इतकें चेतोहर आणि तालबद्ध आहे की, वाचतांना आपण एखादें सुन्दर काव्य वाचीत आहोंत, असा भास होऊन अन्तःकरण हेलावून जातें.

हीच स्थिति श्री० पु० य० देशपांडे यांच्या 'सदाफुली' कादंबरींतील 'एक एकाकी दगड आणि पक्षी' हें प्रकरण वाचतांना होते. एका इंग्रजी

टीकाकाराने तर 'Old Curiosity Shop' मधलें उपरोक्त प्रकरण वाक्यांत किंचित् फेरबदल करून उत्तम निर्यमक छंदांत (Blank Verse) बसवून दाखविलें आहे, म्हणतात !

टॉल्स्टॉयच्या काव्यावरील किंवा छंदोमय रचनेवरील हल्ल्याला बिनतोड उत्तर हेंच की, तुमचें हृद्गत तुम्ही जेव्हा अत्यंत उत्कटत्वाने व्यक्त करूं लागतां, तेव्हा तुमचें गद्य आपोआपच तालबद्ध स्वरूप धारण करूं लागतें-तें छंदोमय होऊं लागतें ! आणि काव्यप्रदेशाच्या सीमेशीं तें इतकी लगट करूं लागतें की, 'Old Curiosity Shop' मधल्या त्या प्रकरणा-प्रमाणे तें काव्यांत केव्हा जमा होईल, त्याचा नेम रहात नाही.

उत्कटत्वाच्या या विशेषामुळे जो अर्थ व्यक्त करावयाला, गद्याला केवढा तरी शब्द-विस्तार करावा लागतो, तोच अर्थ मोजक्या पण रसरसलेल्या शब्दांनी काव्य अधिक परिणामकारक रीतीने व्यक्त करतें. दुसरी गोष्ट अशी की, छंदोमयतेमुळे काव्य वाचकाच्या मनांत कितीतरी काळ घोळत राहूं शकतें आणि त्यामुळे काव्यांत वर्णिलेला परिणाम रसिकांच्या स्मृतिपटला-वर अधिक काळ उमटून राहतो.

उत्कटत्वामुळे उत्पन्न झालेले, अल्पाक्षरबव्हर्थत्व आणि तालबद्ध छंदो-मयता हे दोन गुण आणि छंदोमयतेमुळे आलेली चिरपरिणामक्षमता हा तिसरा उपगुण, या विशेषांनी काव्य गद्यावर केव्हाही सरशी करूं शकेल, असें मला वाटतें. अर्थात् काव्याने गद्यावर केलेली ही कुर्घोडी सिद्ध करतांना उत्कृष्ट गद्याच्या जोडीला, वाटेल ती निकृष्ट छंदोमय रचना बसवून चालणार नाही; छंदोमय रचनेचें-काव्याचें उत्कृष्ट उदाहरणच पुढे आणावें लागेल.

वाङ्मयांत कलावंताच्या हृद्गतव्यक्तीसाठी काव्य आणि गद्य हीं अनादिकाला-पासून चालत आलेलीं दोन सोइस्कर माध्यमें असतांना गद्यकाव्य किंवा काव्यमय गद्य या तिसऱ्या माध्यमाची जरुरी आहे किंवा काय, हा प्रश्न उद्भवतो. माझ्या मतें हा प्रश्न अनाठायीं आहे. गद्यांतून सर्व कांही व्यक्त करणें शक्य असतां काव्याची जरुरी काय? या टॉल्स्टॉयने उपस्थित केलेल्या प्रश्ना-

प्रमाणेच याही प्रश्नाला उत्तर देणें कठीण नाही. विशिष्ट तऱ्हेची प्रतिभा ज्याप्रमाणे छंदोमय रूपच धारण करते, त्याचप्रमाणेच एखाद्या तिसऱ्याच प्रकारच्या प्रतिभेला गद्यगीतांतूनच प्रकट होतां आलें, तर तिने तसें स्वरूप कां धारण करूं नये ? तेव्हा ' गद्यगीत ' हा वाङ्मयप्रकार असावा किंवा नसावा, असा प्रश्न उपस्थित न करतां, असल्यास तो कसा असावा किंवा त्याचे विशेष काय असावेत, याचाच विचार करणें योग्य.

' गद्यगीता ' ला काव्याच्या खाली आणि साध्या गद्याच्या वर, असें मधलें स्थान द्यावें लागेल, असें मला वाटतें. डिकन्स् किंवा पु० य० देशपांडे यांच्या उत्कृष्ट गद्याच्या कांही उदाहरणांचा विचार करतांना आपण पाहिलेंच आहे की, छंदोमय रचना सोडून दिली तर काव्यांत प्रतीत होणारी भावनोत्कटता आणि तिच्या अनुषंगाने येणारें अल्पाक्षर–बव्हर्थत्व आणि सूक्ष्म तालबद्धता, हे विशेष त्या गद्यांत आढळतात. गद्यगीताला हीच कसोटी लावून त्याच्या यशाचें मापन करतां येईल, असें माझें मत आहे. मात्र हा प्रकार हाताळणारांना एक धोक्याची सूचना द्यावीशी वाटते. छंदाचीं बंधनें तोडून गद्याचें स्वातंत्र्य उपभोगणें आणि त्याबरोबरच काव्य निर्मिण्याचें श्रेय घेणें, हा मोका दिसावयाला मोठा मोहक आहे खरा; पण त्यांत भीति एवढीच आहे की, धड काव्यांतलें नाजूक सौन्दर्य नाही आणि धड गद्याचा मर्दानी कसदारपणा नाही, असें होऊन तिसराच अनुचित वाङ्मय–प्रकार निर्माण व्हावयाचा !

मराठी वाङ्मयांत गद्यगीताचा हा नवीन प्रकार सुरू करण्याचें श्रेय श्री० शशाङ्क आणि श्री० शंकर साठे यांना आहे. श्री० शशाङ्क यांनी ' मालती ' नांवाचा आपला काव्यसंग्रह आणि ' शशिकला, ' ' त्याग ' इत्यादि गद्यपद्यात्मक नाटिका प्रसिद्ध केल्या आहेत. त्यावरून मराठी गद्य किंवा पद्य ते किती सफाईने लिहूं शकतात, याबद्दल कुणाचेंही दुमत होणार नाही. ' मालती ' चे प्रस्तावनाकार श्री० प्र० के० अत्रे यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यांच्या लेखनशैलीची " अंगलट रेखीव, सडपातळ व आटोपशीर

आहे. तिची रसवंती फार मंजुळ व मिठास आहे. ”

गद्यगीतलेखकाला या मंजुळ व मिठास भाषाशैलीची अत्यंत आवश्यकता असते. ‘ मरीचिकें ’ तील कुठलेंही गद्यगीत चाळून पाहिलें, तर वाचकाला या मिठास भाषाशैलीचा अनुभव चाखतां येईल. बाराव्या मरीचिकेंतील निशा-शशीच्या प्रेमाचें वर्णन पहा– “ ······ निशेच्या निळया महालांत येऊन शशीने रोज तिचें नवनव्या कलांनी रंजन करावें ······ अचपळ निशाक्षी हरिणेंही गानलुब्ध होऊन अनिमिष नेत्रांनी शशीकडे पहात, त्याच्या गायनाने शिला पाझरूं लागत. वायु पांगळून जाई. वेगाने धावणाऱ्या सरितांचे प्रवाह तुम्बून पाणी तटांत मावेनासें होई ······ ”

गद्यकाव्यलेखकाला अत्यंत आवश्यक असलेली भावनोत्कटताही श्री० शशाङ्कांत भरपूर आहे. “ ··· वर्षभर कुटुंबांतील साऱ्या लहानथोर व्यक्तींच्या सहाय्याने त्याने अत्यंत परिश्रम करून जें शेत पिकविलें, आपल्या रक्ताचें पाणी शिम्पून जें शेत वाढविलें, त्याची आज मळणी होऊन मोत्यांची रास खळयांत पडली होती. ··· सावकाराने सारें धान्य जप्त करून नेलें ··· रिकाम्या खळयांत आनंदाने खेळणाऱ्या अजाण बालकांना पाहून त्याची कंबर-च खचली, ··· त्याच्या नेत्रांतून रक्ताश्रु ठिबकले, ··· ” हें सतराव्या मरी-चिकेंतील शेतकऱ्याचें वर्णन कुणाचेंही अंतःकरण पिळवटून टाकील. ‘मरीचिकें-’त अशीं वर्णनें ठिकठिकाणीं आहेत; पण नुसत्या भावनोत्कटतेने प्रतिभाशाली काव्य निर्माण होत नाही. प्रतिभा अपूर्ववस्तुनिर्माणक्षम किंवा नवनवोन्मेष-शालिनी पाहिजे. तशी असेल तरच ती प्रतिभा !

शेलेसारख्या महाकवीच्या प्रेमकाव्यांत आणि दुसऱ्या एखाद्या सामान्य कवीच्या प्रेमकाव्यांत फरक असतो तो, एकांत उत्कट प्रेमभावना असते आणि दुसऱ्यांत नसते, हा नव्हे. दोघांचीही भावनोत्कटता सारखीच असते. भावना तीच; पण सामान्य कवि ठराविक शब्दांत, सांकेतिक कल्पनांनी नटवून ती व्यक्त करतो. त्याच भावनेने उफाळलेली शेलेची प्रतिभा नव–नवीन

कल्पना प्रसवूं लागते, अपूर्व कल्पनाचित्रा ( Images ) चें मोहनजाल विणूं लागते आणि आपल्या नवनवोन्मेषांनी रसिकांना दिपवून टाकते. श्री० शशाङ्कांचें वर उल्लेखिलेलें शेतकऱ्याचें चित्र हृदय–द्रावक आहे, यांत शंका नाही; पण त्यांत अपूर्व असें कांही वाटत नाही. त्यांची प्रतिभा नवीन कल्पना प्रसवूं शकत नाही, असें नाही. " ... मेदिनीला ग्रासण्याकरिता क्षितिजाकडून अंधकार अजगरासारखा हळूहळू येत होता, ... " ही दुसऱ्या मरीचिकेंतली कल्पना बहारीची आहे; पण अशा सुंदर, अपूर्व कल्पनांचा अभाव ' मरीचिकें ' त तीव्रतेने जाणवतो.

या मौलिकतेच्या अभावाचें कारण कदाचित् असें असूं शकेल. रवींद्रनाथ टागोरांची गीताञ्जली, धी गार्डनर इत्यादि इंग्रजी गद्यगीतांचीं पुस्तकें वाचून श्री० शशाङ्कादि लेखकांनी ही गद्यगीतांची प्रथा महाराष्ट्रांत प्रथम आणली; पण टागोरांच्या बाबतींत एक गोष्ट विसरतां कामा नये. टागोर हे कांही गद्यगीत–लेखक नव्हत. टागोरांचें मूळ बंगाली काव्य छंदोबद्ध आहे. केवळ भाषांतराकरिता म्हणून त्यांनी इंग्रजी गद्याचा अवलंब केला; गद्यगीतें लिहिण्याकरिता नव्हे, अर्थात् टागोरांच्या इंग्रजी भाषेवरील अनुपम प्रभुत्वामुळे आणि जवळ जवळ मुळांतल्या इतक्याच भावनोत्कटतेने त्यानी हीं भाषांतरें केल्यामुळे नुसतीं बङ्गाली पद्यांचीं इंग्रजीं भाषांतरें म्हणून नव्हे, तर उत्कृष्ट गद्यगीतें म्हणून सुद्धा तीं पहिल्या प्रतीचीं ठरलीं ही गोष्ट वेगळी. वॉल्ट् व्हिट्मनप्रमाणे टागोरांची प्रतिभा सहजस्वभाव म्हणून गद्यगीताचें माध्यम निवडीत नाही.

मराठींतल्या गद्यगीतांची अशी विचित्र स्थिति आहे की, तीं स्वतंत्र गद्यगीतें म्हणून लिहिलीं गेलीं आहेत, भाषांतरें म्हणून नव्हे. पण तीं लिहिणाऱ्या श्री० शशाङ्कासारख्या लेखकांच्या स्फूर्तींचा उगम प्रत्यक्ष जीवनानुभवांत नसून टागोरांच्या पुस्तकांत आहे. जीवनाच्या प्रत्यक्षानुभवाने उत्स्फूर्त झालेली प्रतिभा गद्य अगर पद्य माध्यम टाकून दुरतिक्रम स्वभावनियमाने गद्यगीत या तिसऱ्याच माध्यमांतून व्यक्त झाली, असा प्रकार त्यांच्या बाबतींत झालेला नाही. आपल्या बंगाली काव्याचें इंग्रजी गद्यांत भाषांतर करतां-

करतां टागोरांच्या हातून न कळत घडलेल्या मोहक गद्यगीताचें अनुकरण म्हणून त्यांनी गद्यगीतें लिहिलीं आहेत. त्यांत मौलिक कल्पनाचित्रें ( Images ) किंवा जिवंत वातावरण दिसत नाही,त्याचें कारण हेंच. स्फूर्ति उसनी असल्यामुळे त्यांतलें वातावरणही उसनें, बव्हंशीं संस्कृत वाङ्मयांत वाचलेलें, प्रत्यक्षानुभवाशीं–वर्तमानकालाशीं असंबद्ध, भूतकालीन–मध्ययुगीन आहे. 'मरीचिकें' तल्या युवती कांचनमेखला परिधान करून गजगतीनें पावलें टाकीत–सुवर्णमंदिरांत डुलक्या खात पडलेल्या देवाधिदेवाच्या दर्शनाला जातात;– फुलपांखरांच्या रङ्गांचीं पातळें नेसून मलबारहिल्वर किंवा अपोलो बंदरावर त्या फिरावयाला जात नाहीत. डामरी रस्त्यावरून ट्रॅम किंवा मोटार-मध्ये बसून तेथले नागरीक फिरत नाहीत:–ते केशरकस्तूरिकेचे सडे टाकलेल्या रस्त्यावरून खांद्यावरलीं दूकुलें सावरीत आणि कर्णसंपुटांतलीं कुंडलें हालवीत हळूहळू राजप्रासादाकडे जातात. ' मरीचिके'चें जग, प्रतिमालेखन करीत कालक्षेप करणाऱ्या मृगाक्षी, वर्तिकेच्या मंद प्रकाशांत ग्रंथ पठन करणारे वृद्ध द्विज, तपोवनांत दुड् दुड् उड्या मारणारीं हरिणशावकें इत्यादि-कांनी गजबजलेलें आहे.

स्फूर्ति उसनी असेल, पण मराठी वाङ्मयक्षेत्रांत एका नव्या वाङ्मय-प्रकाराचा पाया घालण्याचें महत्त्वाचें कार्य श्री० शशाङ्क यांनी केलें आहे. आणि त्याबद्दल मराठी वाङ्मयाचे चहाते त्यांचे सदैव ऋणी राहतील. गद्य-गीताला आवश्यक असलेली नादमधुर, मृदु भाषाशैली आणि अतीव भावनो-त्कटता त्यांच्यापाशी आहे. त्यांच्या शेवटल्या शेवटल्या मरीचिकांत त्यांची स्फूर्ति स्वतंत्र होत चालल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. त्यांची स्फूर्ति जसजशी प्रत्यक्षानुभवाधिष्ठित आणि अधिकाधिक स्वतंत्र होत जाईल, तसतशी त्यांच्या हातून उत्तरोत्तर सरस गद्यगीतें निर्माण होतील, यांत शंका नाही.

—अनंत काणेकर

# —शशाङ्क यांचीं पुस्तकें—

**१. मालती**– " शशाङ्क या टोपण नांवाखाली निष्कलङ्क काव्य लिहिणारे श्री० दाभाडे यांच्या कवितांचा हा संग्रह वाचनीय आहे. ह्या कवितांत प्रसाद व माधुर्य आहे. शिवाय कल्पना व अन्तःकरणाची तळमळ आहे. "

–रा०सा० **ना० गो० चापेकर.**

**२. भारतीय चित्रकला**— " ग्रंथांतील ऐतिहासिक माहिती व तिचें केलेलें विवेचन उत्कृष्ट दर्जाचें आहे ··· ' भारतीय चित्रकलेचें प्राचीनत्व व चित्रलक्षण ' हा भाग महाराष्ट्रीय चित्रकारांस व चित्रकलाप्रेमी लोकांस अत्यन्त महत्त्वाचा वाटेल. आपल्या या कृतीबद्दल आपण आपलें नांव भारतीय सृष्टींत अजरामर करून ठेवलें आहे, असें मी पूर्ण निश्चयाने लिहितों. "

–रा०ब० **मा० वि० धुरंधर.**

**३. शशिकला**— " पात्रें, प्रसंग व भाषा या तीनही बाबतींत पूर्ण संयमशील असणारी नाटिकाच वाचकांच्या मनावर दृढ ठसा उमटवूं शकते. या दृष्टीने शशांकांची ही कृति निःसंदेह कौतुकास्पद आहे ··· शशांकांच्या लेखनांत नाट्यगुण अव्वल दर्जाचा आहे, हें या नाटिकेवरून स्पष्ट दिसून येतें ··· ही नाटिका चिमुकली, चटकदार, चतुरतापूर्ण व चांगली उतरली असून मराठींत अशा भावपूर्ण काव्यमय नाटिकांचा प्रयोग प्रथमच कलाचतुर कौशल्याने केल्याबद्दल रसिक वाचक श्री० शशाङ्क यांचे ऋणी राहतील."

–श्री० **र० गो० सरदेसाई** ( विहार )

**४. त्याग**– " धर्माच्या बाबतींत सनातनीयांकडून समाजांत कसे अन्याय होत आहेत आणि त्यासंबंधाने राजसत्तेचीं कर्तव्यें काय, हें या नाटिकेच्या द्वारें फार मार्मिकपणें दाखविण्यांत आलें आहे. शेवटचा भाग माझ्या मतें सर्वांत चांगला आहे. अशा रीतीने एक एका विषयावर नाट्यपद्धतीने लोकजागृति कशी करतां येईल हें या लहानशा कृतीवरून चांगलें निदर्शनास येते..."

–रा० सा० **गो० स० सरदेसाई.**

# निवेदन

वाङ्मय–प्रान्तांत विहार करणाऱ्या कसलेल्या लेखकाला सुद्धा पावलोपावलीं बुजल्यासारखें होतें; मग या वेळीं माझें–नवख्याचें–अन्तःकरण कातर झाल्यास नवल नाही. तरी पण केवळ रसिक वाचकांच्या प्रेमळ उत्तेजनाच्या जोरावरच मी एकेक पाऊल पुढे पुढे टाकण्याचें धाडस करीत आहें.

सन्ध्यासमयीं शुक्राची तारका विषादयुक्त मनाला थोडीतरी उत्साहित व आल्हादित करते. ‘ **मरीचिका** ’ माझ्या जीवनांत शुक्राच्या तारकेचें कार्य करते. मरीचिकेंतील पानापानांतून शब्दाशब्दांतून– मी माझें अन्तःकरण ओतलें आहे. भल्याबुऱ्या– चांगल्या वाईट– भावनांना नि अनुभवांना मी शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. यांत प्रतारणा कुठेच नाही.

तिन्हीसांज होतांच रातराणीचा मत्त परिमल वायुलहरी आसमन्तांत वाहून नेऊन सर्व वातावरण सुगन्धाने धुन्द करून सोडतात. ‘मरीचिका’ लिहीत असतां मी स्वतः त्या वातावरणांत वावरत असल्याचा अनुभव मला आला. ‘ मरीचिकें’तील एखाद्या कल्पनेने जरी वाचक आनन्दित झाला, तरी पुष्कळ झालें ! पहिल्या २५ मरीचिका एकेकशः स्वतंत्र आहेत; पुढील २६ ते ३३ अखेर एक कथासूत्र आहे.

कार्य राहिलें ऋणांचा उल्लेख करण्याचें. मरीचिका २ मधील उत्तरार्धांतील कल्पना एका इंग्रजी गद्यकाव्यावरून घेतली आहे. मरीचिका २४ ची उभारणी घडलेल्या हकीगतीवरून—सत्यकथेवरून— केली आहे.'विहार' मधून मरीचिका क्रमशः प्रसिद्ध केल्याबद्दल रा० चन्द्रकान्त बावडेकर यांचा मी आभारी आहें. माझे प्रिय सुहृद् माधव मनोहर व शङ्कर साठे यांनी मरीचिकेची घडण निर्दोष करण्यास तत्परतेने सहाय्य केलें, याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. माझे नवपरिचित मित्र व नामवन्त साहित्यिक अनन्त काणेकर यांनी माझी ओळख नसतांहि प्रस्तावना देऊन मला उपकृत केलें आहे, याबद्दल मी त्यांचा कसा उतराई होऊं ? वेष्टनावरील चित्राबद्दल रा० कोव्याळकर व पुस्तकांतील सर्व रेखाचित्रांबद्दल रा० वि० ना० गोलिवडेकर यांचा मी आभारी आहें. पुस्तकांतील तिरंगी चित्र देण्याचा ज्या प्रिय व्यक्तीने आपलेपणा दाखविला, तिचा उल्लेख न करतां तिच्या ऋणांत राहण्यांतच आनन्द आहे.

औन्ध

शशाङ्क



# म री चि का

मरीचिका



मरीचिका पृष्ठ १२

## मरीचिका

आ. क्र. ....

# १

निळ्या केशकलापांत चान्दण्यांचीं फुलें माळून रजनी प्रशान्त सरोवरांत आपलें सुंदर मुखकमल निरखीत होती. आपलें यौवन व सौंदर्य पाहून तिच्या मुखावर किंचित् अभिमानाचें मधुर हास्य तरंगलें आणि मुखावरील शुक्राच्या चान्दणीची खळी पाहून तिला कितीतरी बरें वाटलें !

कुणाकरिता रजनीने एवढा साजशृंगार केला असावा हा ?

भिरभिरत्या नयनांनी तिने सभोवार पाहिलें. तिच्या हृदयांत हुरहूर वाढूं लागली. तिचें हृदय ओढ घेऊं लागलें. वायूच्या रूपाने ती जड निःश्वास सोडूं लागली. बावरत्या लोचनांनी व अधिऱ्या अंतःकरणाने तिने प्राचीकडे सोत्कण्ठ पाहिलें.

प्रियकराच्या मीलनाकरिता आसावली होती ती !

थोड्याच वेळांत पूर्वेकडे नीलाकाशांत तांबुस-पिवळया रंगाची प्रभा फांकूं लागली. वृक्ष व पर्वतशिखरें रजनीच्या प्रियकराचें दर्शन घेण्यासाठी पूर्वेकडे माना उंचावून न्याहाळून पहात होतीं. क्षितिजाचा पडदा दूर सारून सुधांशूने नीलाकाशांत पदक्षेप केला. त्याचीं अमृतमय शुभ्र किरणें सर्व वस्तुमात्रांना आनंदित करूं लागलीं. त्याच्या सुधाधवल व शीत किरणांनी रजनी न्हाऊन निघाली.

रजनीच्या मुखावर मृदु हास्याची शुभ्र छटा दृग्गोचर झाली. तिच्या निळ्या लोचनांतील जादूने तो मन्त्रमुग्ध झाला.

सुधांशु-रजनीचीं अन्तःकरणें मीलनाने आनन्दसागरांत पोहूं लागलीं.

मेदिनी व्याकुळ होऊन तें दृश्य पहात होती. ती दुक्खाने सुस्कारे सोडूं लागली. रजनीच्या सुखाने मेदिनीला काय म्हणून आनन्द वाटावा ?

एकाचा आनन्द दुसऱ्याला दुक्खद होतो का ?

थोड्याच वेळांत क्षितिजावर मेघगर्जना सुरू झाली. मृतांच्या शरिरांतही युद्धाचें वारें खेळूं लागावें, एवढी भयंकर मेघगर्जना होती ती ! क्षितिजाकडून मेघ पुढे पुढे चाल करून येऊं लागले. अन्धकार मी म्हणत होता; पण त्यांतूनही मेघांच्या समशेरी सौदामिनीच्या तेजाने चमकत होत्या. मेघांच्या दुन्दुभिध्वनीने मेदिनीच्या शरिरावर गोड संमोह-लहरी येऊं लागल्या.

साऱ्या सैनिकांनी एकजात काळा पोशाख चढविला होता. एका लोंढ्यामागून सैनिकांचा दुसरा लोंढा आला. क्षणाक्षणाला क्षितिजाआडून नव्या दमाचे तरुण सैनिक वेगाने गगनप्रान्त आक्रमू लागले.

शस्त्रांचा खणखणाट व चपलेचा कडकडाट सुरू झाला. पृथ्वीतलावरचे सुष्टदुष्ट प्राणी भयभीत होऊन निवाऱ्याचें आश्रयस्थान शोधूं लागले. पंचमहाभूतांवर विजय मिळवूं पाहणारे मानवसुद्धा भयभीत झाले.

रजनीशीं एकान्तांत गुजगोष्टी करणाऱ्या सुधांशूला मेघसैनिकांनी निष्प्रभ केलें.

प्रलयकालची वेळ !

रजनी भयभीत होऊन आपल्या निस्तेज व बद्ध प्रियकराकडे केविलवाण्या मुद्रेने पाहूं लागली.

मोराने टाहो फोडला, 'मेदिनी!, ऊठ ऊठ, जागी हो!'

प्रलयकाळची वेळ !

मेदिनीने मधुर हास्य केलें.

मेघाने तिला आपल्या बाहुपाशांत बद्ध केलें. मेदिनी आनंदरसांत न्हाऊन निघाली आणि रजनी व्याकूळ होऊन तें दृश्य पहात होती !

## मरीचिका : : : : : : : : २

भगवान् सहस्ररश्मी विश्रांतीकरिता अस्ताचलामागे प्रयाण करीत होता. नभोमण्डलांतील प्रतिक्षणीं बदलणाऱ्या मेघखण्डांचें अतीव मनोहर सौंदर्य लोपूं लागलें होतें.

दिवसभराच्या कष्टाने श्रमित झालेले शेतकरी खांद्यांवर आसूड टाकून बैलांना घेऊन उदास अन्तःकरणाने घराकडे परतत होते.

आपल्या पिलांची भेट घेण्यास उत्कंठित झालेले अधीर पक्षी आपापल्या घरट्याकडे धाव घेत होते.

जीवमात्रांची चाललेली शेवटची धडपड ऐकूं येत होती.

मेदिनीला ग्रासण्याकरिता क्षितिजाकडून अंधकार अजगरासारखा हळू-हळू येत होता. अज्ञात भीतीने जीवमात्राच्या हृदयांत थरकाप उडत होता.

अन्धकाराने सारी मेदिनी—आकाशही ग्रासून टाकलें. सारे जीव आपापल्या निवासस्थानांत दुःखाचे सुस्कारे टाकीत होते. याच अंधाऱ्या रात्रीं खिडकीशेजारीं बसून अन्तराळांतील तारकांशीं तो गुजगोष्टी करीत होता. कुणाला वाटलें असतें की, याला वेडच लागलें आहे! त्याचे अधिरे नेत्र आकाशाकडे लागले होते. वर्षाकाळीं नभःप्रांगणांत जमणाऱ्या कृष्ण मेघाप्रमाणे त्याच्या तेजस्वी नेत्रांत व्याकुळ भाव तरंगत होते.

आज त्याचें हृदय शून्य होतें!

पण त्याच्या रोमरोमांतून आनन्द सळसळत होता.

अनेक वर्षे हृदयाशीं बाळगलेली एकमेव आस आज पूर्ण झाली, म्हणून

तो आनन्दाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झाला होता; पण–त्याच्या रिक्त हृदयांत उसळणारें दुक्ख अश्रूंच्या रूपाने पाझरूं लागलें होतें.

सुख–दुक्खाच्या विरुद्ध भावनांनी तो गुदमरला होता.

त्याच्या मुखावर व नेत्रांत परस्परविरुद्ध भावनांचा कल्लोल उडाला होता.

कितीतरी वेळ अशा मुग्ध मनःस्थितींत बसला होता तो !

शिशिरांतील हिमवायूच्या झुळुकीने त्याचें अंग थरारलें आणि तो भानावर आला.

त्याने मस्तक वळविलें.

सारी खोली अन्धकाराने व्यापिली होती.

त्याने सगळीकडे नजर फेंकिली. अन्धकाराची भेसूरता मात्र त्याला जाणवली.

त्याने दीप पेटविला. वर्तिकेचा मन्द प्रकाश अन्धकार घालविण्याचा विफल प्रयत्न करीत होता. त्या मन्द प्रकाशाने खोलीला अधिकच भेसूर स्वरूप प्राप्त झालें होतें. सुवर्ण–ज्योतीवर झडप घालून एक पतंग अपूर्व त्यागाच्या द्वारें आपलें प्रेम व्यक्त करूं लागला.

खोलीच्या कोपऱ्यांत त्याने नजर फेंकिली !

त्याच्या कठोर तपश्चर्येची फलप्राप्ति व्यक्त स्वरूपांत तिथें विराजमान झाली होती.

अनेक वर्षे त्याच्या मनश्चक्षूंपुढे एक सौन्दर्यपूर्ण दृश्य भासमान होत होतें. कल्पनामेघावर आरूढ होऊन आपल्या सौंदर्यदेवतेच्या प्रतिक्षणीं वर्धिष्णु सौन्दर्याचें तो आकंठ पान करीत होता. दररोज रात्रीं त्याची सौन्दर्यदेवता त्याला तारकांच्या समूहांत अस्पष्ट भासमान होई. त्या भासमान होणाऱ्या सुन्दर दृश्याला मूर्त शिल्पस्वरूप देण्यासाठी त्याने गेलीं अनेक वर्षं अविश्रान्त परिश्रम केले होते. कालच त्याला उठतां बसतां

भासमान होणाऱ्या सौन्दर्याने पार्थिव स्वरूप धारण केलें होतें. भासमान होणारी सौन्दर्य-प्रतिमा मूर्तीच्या रूपाने दृश्य झाली खरी; पण आज सकाळपासून त्याला चुकल्याचुकल्यासारखें वाटूं लागलें होतें. ती भासमान होणारी सौन्दर्यमूर्ति आता भासमान होईना आणि म्हणूनच त्याचें हृदय शून्य झालें होतें. कितीही प्रयत्न केला, तरी त्याच्या हृदयसिंहासनावर ती सौन्दर्यमूर्ति कांही अधिष्ठित होईना.

तो हळूहळू पावलें टाकीत त्या मूर्तीकडे गेला !

त्याची अतुलनीय कलाकृति त्याच्या समोर उभी होती.

दोन प्रेमी जीवांचा अपूर्व संगमच तो !

रजनी उभी होती. तिच्या अंगप्रत्यंगांतून सौन्दर्य व तारुण्य निथळत होतें, उजवा गुडघा तिने किंचित् वाकविला होता. कमरेला डाव्या बाजूला किंचित् बांक देऊन तिने आपलें ऊर्ध्वांग मागे वळविलें होतें. आपल्या डाव्या अर्धस्फुट उभार उरोजावर डावा हात ठेविला होता. तिच्याच मागे पर्वताला टेकून रजनीनाथ उभा असून त्याने तिची हनुवटी आपल्या डाव्या हाताने धरली होती व उजव्या हाताने रजनीच्या नाजूक कमरेला त्याने विळखा घातला होता. रजनीने आपला उजवा हात रजनीनाथाच्या गळयाखालून नेऊन त्याच्या मस्तकावर ठेविला होता. त्याच्या विशाल वक्षःस्थलावर आपली कोमल काया व मस्तक टेकवून ती उभी होती आणि तो तिच्यावर चुम्बनांचा वर्षाव करीत होता.

किती रमणीय आणि कलापूर्ण दृश्य हें !

मूर्तीच्या प्रत्येक भागांतून कलावानाचें नितान्त कौशल्य व्यक्त होत होतें. अनेक वर्षांच्या तपश्चर्येचें फल समोर पाहून त्याच्या नेत्रांत किंचित्काल समाधानाचे भाव तरंगून गेले.

आनन्दातिशयाने त्याने दोन्ही हात उभारले व तो मोठ्याने पुटपुटला—

' माझ्या जीविताचा आनन्द ! '

शो. ८ ५०५

गुडघे टेकून त्या मूर्तीच्या पायांवर त्याने आपलें मस्तक नमविलें.

कां नाही त्याला आनन्द वाटणार ?

रजनीच्या मोहक चेहेऱ्यांत त्याला प्रेमळ मृत पत्नीचा भास होत होता !

रजनीनाथाच्या आणि त्याच्या मुखांतील साम्य एखाद्या अंधाने सुद्धा ओळखलें असतें.

दूरच्या खेडेगावांतील रखवालीस असलेल्या रामोशांचा अस्फुट ध्वनि कानावर आला आणि तो आपल्या गुंगींतून भानावर आला. तिला आपाद न्याहाळण्याकरिता त्याने आपलें मस्तक वर उचललें; पण कुठे गेली ती ?

घन तिमिराशीं झगडणारी कापरी ज्योत वायूच्या मोठ्या झुळुकीबरोबर मालवली गेली आणि पुन्हा सारी खोली घनान्धकाराने भरून गेली.

ती तिथेच होती !

तिच्या हिमयुक्त व कठीण पदकमलांचा स्पर्श त्याच्या अधरास भासमान होत होता.

त्याच्या हृदयसिंहासनावर पूर्वी भासमान होणाऱ्या सौंदर्यदेवतेचें तें प्रत्यक्ष प्रतीक होतें.

शशिकला मावळली होती; पण तिचीं रुपेरीं किरणें अजून अशोकाच्या शेंड्यांवर पर्णांचें चुम्बन घेण्याकरिता घुटमळत होतीं. लाजऱ्या माधवीने नुक्तीच कुठे पाकळ्या फुलविण्यास सुरुवात केली होती. तिचा मित्र अनिल तिचा सुगन्ध दश दिशांत पसरविण्याची कामगिरी करण्यांत गुंतला होता.

निराश होऊन सद्गदित कण्ठाने कलावान् म्हणाला, " माझ्या जीवनाचा प्रकाश ! कुठं आहेस तूं ? "

' इथं तुझ्या हृदयांत! ' उत्तर आलें.

पण कुणी उत्तर दिलं ?

तो क्षणमात्र गोंधळला. त्याच्या हृदयांत आनन्द मावेनासा झाला. खोलीच्या कोपऱ्यांत– समोरच –त्याने अधिऱ्या नेत्रांनी पाहिलें. त्याने

दोन्ही हात पसरले व धडधडत्या अन्तःकरणाने तो बोलला— " ये ये, तुझ्या कोमल शरिराचा ऊबदार स्पर्श मला होऊं दे ! मला एकदा तुला डोळे भरून पाहून घेऊं दे ! माझ्यावर तूं आपल्या सुधादृष्टीचा वर्षाव कर ! बोल ना ! पण तूं कुठं आहेस ?"

स्वप्नमय वातावरणाला शोभेल इतक्या सौंदर्यपूर्ण व मधुर शब्दांत उत्तर आलें, ' इथं तुझ्या हृदयांतच मी आहें ! '

' माझ्या हृदयांत ? ' त्याने निराशपूर्ण स्मित केलें. ' नाही ! मला पूर्ण माहीत आहे. उघड्या खिडकींतून जेव्हा सकाळीं उषेने पाऊल न वाजवितां प्रवेश करून मला स्पर्श केला, परिमलयुक्त दक्षिण वाताने माझ्या मूर्धजांचें चुम्बन घेतलें, तेव्हा सृष्टीच्या सौन्दर्यांत अथवा रूपांत अथवा रंगांत तुझें स्वरूप अवलोकन करावें, म्हणून जागृत झालों; तरी पण हें माझं हृदय अगदी रिक्तच राहिलं ! '

'मेघांचा गडगडाट झाला. गगनांत चपला नृत्य करूं लागली. भयंकर वादळांत तुझा निळा अंचल फडफडत आहे, असा मला भास झाला. संध्याकाळ होऊं लागली, तुझ्या पाउलांचा ध्वनि माझ्या कानावर पडत आहे, असा मला क्षणोक्षणीं भास होऊं लागला ! तरी पण तुझ्या–माझ्यांत अमर्याद अन्तर आहे, अशी जाणीव मला झाली. बोल ! सांग, पुन्हा सांग. तूं कुठं आहेस ? '

' तुझ्याच हृदयांत ' ती मंजुळ स्वरांत उद्गारली.

' मग तूं माझ्या दृष्टीला दिसत कशी नाहीस ? '

' कारण तूं अन्तर्दृष्टीने पहात नाहीस ! तुला मी सगळीकडे भासमान होतें; पण मी तुझ्या हृदयांतच तुझी मार्गप्रतीक्षा करीत आहें. '

कलावानाने आपलें जड झालेलें मस्तक तिच्या मूर्तीच्या पायांवर ठेविलें. मूर्तीच्या पायाला आपल्या क्षीण हातांनी विळखा घातला जणू कांही स्वप्नांतल्यासारखाच तो पुटपुटला, ' पण माझं हृदय खरंच शून्य आहे– अगदी पूर्ण रिक्त आहे! ' —

कोमेजल्या फुलांचा सुगन्ध लुप्त होतो! निर्धनावस्थेंत स्नेही सोडून जातात, तद्वत् हेमन्तागमाने मेदिनीच्या गात्रांतील चांचल्य गोठून गेलें होतें.

तिला ग्लानि आली होती!

क्षितिजाआडून व्योमपटल किंचित् बाजूला सारून वसंताने डोकावून पाहिलें. मेदिनीची दीनावस्था पाहून त्याला तिची करुणा आली. हळूच येऊन त्याने तिला हृदयाशीं धरलें. फुंकर घालून तिला शुद्धीवर आणलें. त्याच्या मंद उष्ण श्वासाने तिला जाग आली व सहानुभू हृदयाशीं दुःखार्त अंतःकरण भिडतांच गालांना गाल टेकले गेले. प्रथम पल्लवांचे रोमांच उभयतांच्या अंगावर उभे राहिले. गालांवर फुलें फुललीं. डोळयांत मौक्तिक-सर जमले आणि–

सहस्ररश्मीच्या प्रखर तापाने कोमेजलेली नाजुक कमलिनी शशीच्या दर्शनाने प्रफुल्लित व्हावी, त्याप्रमाणे वसंताला पाहतांच मेदिनी खुलली. वसंत-वायूची गोड लहर तिच्या तरुण हृदयाला स्पर्श करून गेली आणि तिची तनुलतिका अभूतपूर्व आनंदाने पुलकित झाली. तिचें कुमारीहृदय विचालित झालें. वसंतजीवनाने तिची शुष्क हृदयवेल पालवली.

मेदिनीच्या मुखावर हास्य खेळूं लागलें. कोमल पल्लवांच्या रूपाने तिने आपला आनंद प्रगट केला. कोकिलेच्या द्वारें ती हृदयाचे प्रेमपाठ गाऊं लागली.

प्रेम हें तारुण्याबरोबरच उत्पन्न होतें. प्रेमाचा जन्म मनांत होतो, तर तारुण्य हृदयावर दृग्गोचर होतें.

वसंत–मेदिनीच्या मीलनाने चराचर सृष्टीला अत्यानंद झाला.

मेदिनीच्या आयुष्याचें एक नवीन पान उलटलें गेलें.

---

## मरीचिका : : : : : : :

१०.५.५१ २१.१०.१३

बालरवीने उदयाचलावर नुकतेंच आरोहण केलें होतें. सर्व चराचर सृष्टींत नवचैतन्य उत्पन्न झालें होतें. सृष्टि–सुन्दरीच्या हिरव्या शालूवर पडलेले दवबिन्दु प्रभात–कालीन रवीच्या किरणांनी चमकत असल्याने शालूवर जरतारी काम केल्याचा भास होत होता. नलिनीदल–मंचकावर पहुडलेल्या मधुकरांना नुकतीच जाग आली होती. पक्ष्यांच्या मधुर संगीताने सारें तपोवन निनादित झालें होतें. बटूंच्या वेदघोषाने आणि गौतमाच्या अस्तित्वाने तें तपोवन पवित्र झालें होतें. जवळच वैतरणी नदी मन्दगतीने वाहात होती. तपोवनांतील लहानमोठ्या वृक्षांचीं हलतीं प्रतिबिंबें सरितेच्या प्रशांत पृष्ठभागावर लपंडावाचा खेळ खेळत होतीं. तपोवनांत हरिणशावकें इतस्ततः उड्या मारीत होतीं. पुष्पांच्या मधुर सुवासाने सारें वन दरवळून गेलें होतें. त्या रम्य स्थलीं मूर्तिमंत प्रसन्नता विलसत होती.

× + +

तपोवनाच्या सीमेवर सारथ्याने रथ उभा केला. दोन सख्यांसह राजकन्या खाली उतरली. ती रूपाने अप्रतिम होती. रत्नजडित वेणीबंध तिच्या पाठीवर रुळत होता. मस्तकावर मोत्यांची जाळी होती. तिचे गुलाबी कपोल, हरिणासारखे डोळे, फुलाच्या पाकळ्यांसारखे ओठ, हिऱ्यासारखे दांत, सारें कांहीं अवर्णनीय होतें. तिने हिरवी रत्नजडित कंचुकी घातली होती. कमरेच्यावर कंचुकीशिवाय दुसरें उत्तरीय नव्हतें. खाली शुभ्र दुकुल परिधान केलें होतें. हातांत रत्नकंकणें व पायांत सुवर्णनूपुरें होतीं. ती अवनत दृष्टीने आश्रमाकडे चालली होती. तिच्या मागोमाग तिच्या दोन सख्या चालल्या होत्या. त्यांच्या हातांत सुवर्णपात्रें होतीं.

राजकन्येने आश्रमांत प्रवेश केला आणि पक्ष्यांनी तिचें मधुर कूजनाने

स्वागत केलें. आश्रमाच्या मध्यभागीं एक विस्तीर्ण बोधीवृक्ष होता. त्या वृक्षाखालीं गौतम पद्मासन घालून बसला होता. त्याच्या शरिराची कान्ति आणि मुखाची प्रभा पावित्र्याचें तेज सर्व दिशांना फेकीत होती. राजकन्या गौतमाजवळ गेली आणि भक्तियुक्त अन्तःकरणाने तिने त्याला वन्दन केलें. सख्यांनी सुवर्णपात्रें पुढे केलीं. राजकन्येने गौतमाची पूजा केली. त्याच्या चरणावर पुष्पें वाहिलीं. हात जोडून ती गौतमापुढे उभी राहिली.

गौतमाने विचारिलें, 'राजकन्ये ! कां येणं केलंस ?'

'गुरुमहाराज ! मजवर आपण अनुग्रह करावा.' राजकन्येने विनीत होऊन विनंती केली.

'विलासाचा त्याग केल्याशिवाय निर्वाण–मार्ग दिसत नाही.'

'महाराज ! विलासाचा उपभोग घेऊनही मी त्यापासून पूर्ण अलिप्तआहें.' गौतम हसला.

'महाराज ! राजकन्येवर अनुग्रह करावा !' गौतमाचे शिष्य सर्व बाजूंनी गौतमाला म्हणाले.

'संपत्तीचा व शारीरिक सुखाचा अभिलाष धरूं नकोस. सर्व प्राणिमात्रां- विषयीं प्रेम बाळग. तुझं कल्याण होईल.' गौतम म्हणाला.

'महाराज ! आपल्या पायांची प्रत्यक्ष सेवा माझ्या हातून नित्य घडावी, ही इच्छा आहे.' राजकन्या दीन मुद्रेने बोलली.

'महाराज ! आपल्या सेवेकरिता राजकन्येला आश्रमांत ठेऊन घ्यावें.' सर्व शिष्य आग्रहाने म्हणाले.

'बाळ ! जा, राजवाड्यांत राहून तूं माझी चांगली सेवा करूं शकशील. मात्र माझा उपदेश ध्यानांत ठेव.' गौतम म्हणाला. राजकन्येने त्याला वंदन केलें. मुदित अन्तःकरणाने ती सख्यांसह राजवाड्याकडे परतली.

× × ×

सायंकाळची वेळ. झोपड्यांतून दीप प्रज्वलित होत होते. सूर्य अस्ताचला-

वर विश्रांतीस्तव टेकला होता. गौतम शहराबाहेर पडला व तपोवनाच्या मार्गाला लागला. मार्गाच्या बाजूला एका वृक्षाखाली एक तरुण मुलगी खिन्नवदन होऊन रुदन करीत होती. तिचें वय १६ वर्षांचें होतें. तिच्या गात्रागात्रांतून तारुण्य आणि सौन्दर्य मुसमुसत होतें. तिचा रंग काळसरच. पण अवयव नितान्तसुन्दर आणि रेखीव होते कुणाही तरुणाचें मन सहज ओढून घेण्याइतकी ती रूपवती होती; पण आता ती दुःखातिशयाने रुदन करीत होती.

गौतम थांबला. तिच्याकडे त्याने पाहिलें. तो तिच्या जवळ गेला आणि म्हणाला, 'बाळ ! कां बरं शोक करतेस ?'

तिने वर मान केली; गौतमाकडे नजर फेकली. पुन्हा मस्तक अवनत करून ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. गौतमाचें हृदय कळवळून आलें. तो तिच्या अधिक जवळ गेला व म्हणाला, 'बाळ ! माझ्या हातून तुझं दुःख हलकं होऊं शकणार नाही का ? '

'दुःख ! आता कोण माझं दुःख हलकं करणार ?' अश्रुपूर्ण नेत्रांनी तिने पृच्छा केली.

'नगराबाहेर येऊन तूं अशी कां शोक करीत आहेस ?'

'मला राजाने नगराबाहेर घालवून दिलें आहे. यापुढे नगरांत प्रवेश करण्यास मला बंदी आहे. '

'कां बरं ?'

' मी पतित आहें. '

' म्हणजे ? '

' एका तरुणाने माझं पावित्र्य नष्ट केलं. मी पतिता–भ्रष्ट झालें, म्हणून मला कायमचं नगराच्या बाहेर हद्दपार केलं आहे ! '

' पण तूं त्या तरुणाच्या वासनेला कां बळी पडलीस ? ' त्या दुःखांतही तिच्या मुखावर स्मिताची रेषा चमकली. ती म्हणाली, ' तारुण्यांत पदार्पण

केल्यावर कुमारिकांना शारीरिक सुखोपभोगाची इच्छा उत्पन्न झाल्यास तो त्यांचा दोष होईल का? अशा सुखाची मला इच्छा झाली; पण ती मी सहसा व्यक्त केली नाहीं. ज्याने माझें कौमार्य भ्रष्ट केलें त्याने माझ्याशीं विवाह करण्याचें अगोदर वचन दिलें. वचनपूर्तीच्या अगोदर त्याने माझी इच्छा पूर्ण केली आणि माझा गळाही कापला, आता मी पतित झालें. मी कितीही चांगल्या तऱ्हेने वागलें, तरी समाजाच्या दृष्टीने अपवित्र ठरलें. समाज मला आपल्यामध्ये राहून देत नाही. राजाने मला घालवून दिलें. आप्तगोत मजवर उलटले. माझें जीवित इथेंच संपलें ! " ती मुक्त कंठाने रुदन करूं लागली.

' बाळ ! चल मजबरोबर माझ्याजवळ रहा. मी तुझें मुलीप्रमाणे पालन करतों. ' तिच्या पाठीवरून हात फिरवीत गौतम म्हणाला.

ती एकदम चमकली. त्याच्या बोलण्यावर तिचा विश्वास बसेना. नेत्र विस्फारून ती त्याच्याकडे पाहूं लागली. ती मन्त्रमुग्ध झाली. गौतम हासला.

' चल बाळ ! विलंब नको. '

गौतमाने तिला उठविलें.

तिने गौतमाकडे अश्रुपूर्ण नेत्रांनी पाहिलें, आणि त्याचे पाय घट्ट धरले. गौतमाने तिला उचलून घेतलें. पोटाशीं धरलें. मस्तक अवघ्राण केलें.

गौतम पुढे चालू लागला. ती चाण्डाळ कन्या त्याच्या मागोमाग जात होती.

आपल्या आश्रमांत सच्छिष्याची भर पडल्याबद्दल गौतमाला आज आनंद झाला होता.

# मरीचिका : : : : : : : : ५

त्याने नन्दनवनांत प्रवेश केला, तेव्हा त्याच्या हृदयांत अनेक भावनांचे कल्लोळ उठले.

नन्दनवनाची शोभा अतुलनीय होती !

जिकडेतिकडे फुलेंच फुलें ! एकूण एक वृक्षवल्लरी टवटवीत नि प्रफुल्ल दिसत होत्या. पुष्पांच्या मनोहर सुगन्धाने व मधुकरांच्या गोड गुंजारवाने मधुर ग्लानि येत होती.

उत्फुल्ल कमलिनींच्या चेतोहर परिमलाने सारें नन्दनवन दरवळून गेलें होतें. हीं फुलें आणि कमलेंसुद्धा कधीही न सुकणारीं व न कोमजणारीं होतीं. फुलांचे ताटवेसुद्धा किती मजेदार व सुंदर रीतीने लावले होते ! कारंजांतील उडत्या तुषारांनी मखमली हिरवळ दहिवरून गेली होती. ठिकठिकाणीं वेलींचे कुञ्ज तयार केले होते. मधून सुवासिक व मधुर शीत जलाचे पाट वहात होते. पक्व फळांनी भारावलेले वृक्ष नन्दनवनाची शोभा द्विगुणित करीत होते.

तिथे भग्न हृदयांचे सुस्कारे, कष्टी जीवांचें आक्रंदन व दुःखी जनांचीं आंसवें यांचा मागमूस तरी असणें शक्य आहे का ?

मृत्यूची चाहूल ?

छेः ! मृत्यूची कल्पनाही तिथे कुणाला नव्हती. तिथे विलासी प्रणयी जनांचे सुस्कारे फक्त ऐकूं येत. अश्रु आनंदाचे. मधुर सुखाच्या ग्लानींत सारेच गुंग असत. पृथ्वीवर कधीही न आढळून येणारें सौंदर्य नन्दनवनांत लास्य करीत होतें.

त्याने नन्दनवनांत प्रवेश केला. सभय उत्कंठेने तो इकडे तिकडे पाहूं लागला, तोंच एक लावण्यवती अप्सरा त्याच्या सन्निध आली. तिच्या गात्रागात्रांतून तारुण्य निथळत होतें.



तिची कान्ति शशिप्रभेसारखी होती. नजर ठरत नव्हती तिच्यावर. तिने मधुर स्मित केलें आणि त्याला सागराच्या उसळत्या लाटांवरील फेसाची आठवण झाली.

तिच्या प्रेमळ कटाक्षांत त्यास सुकुमार पारिजातक पुष्पांच्या वर्षावाचा भास झाला.

तिच्या नेत्रांत तारकांचें तेज व मद्याची मादकता एकवटली होती. तिच्या नाजुक हातांत अमृताचा कलश होता. तारुण्याचा उन्माद तिच्या शरिरांत शिगोशिग भरला होता. धुंदींत पण डौलांत पावलें टाकीत ती त्याच्यावळ आली. प्रभातवायूने कलिका फुलतात, त्याप्रमाणे तिच्या सुगंधी श्वासाने त्याची हृदयकलिका प्रफुल्ल झाली. नागिणीच्या फणेप्रमाणे शरिरास आकर्षक बांक देऊन तिने एकच कटाक्ष फेकला आणि त्याचें हृदय विद्ध झालें. अनन्त जन्मींची पुण्याई फळाला आली, असें त्याला वाटलें आणि दोघेंही बाहुपाशांत बद्ध झालीं. नन्दनवनांत प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य होतें. वाटेल तिकडे हिंडावें, गंधर्वांचें गायन श्रवण करावें, अप्सरांबरोबर विहार करावा, मनसोक्त अमृत प्राशन करावें, हा तिथला कार्यक्रम. प्रत्येकाची भ्रमरवृत्ति. मनसोक्त वास घेतलेलें फूल टाकून द्यावें, तद्वत् रोजरोज तो नवीन नवीन अप्सरांच्या सहवासांत स्वर्गसुख उपभोगूं लागला. अप्सरादेखील सर्व बाततींत पूर्ण स्वतंत्र होत्या.

प्रत्येक जीव नाविन्यासाठी भुकेलेला असतोच !

कांही दिवस गेले !

नन्दनवनांतील उपभोगाच्या उन्मादाचा व रेखीव सुखाचा त्याला आता थोडाथोडा कंटाळा येऊं लागला. रोजरोज त्याच त्या गोष्टी नि तींच तीं सुखें! त्याकरिता परिश्रम नाही, प्रयत्न नाही, कांही नाही. सारीं सुखें पायाशीं हात जोडून उभीं! म्हणूनच त्या सुखाला त्याचें मन विटूं लागलें होतें. पृथ्वीतलावरील अनन्त दुःखांच्या कोंडमाऱ्यांत व्याकुळ झालेल्या जीवाला कष्टाने प्राप्त झालेल्या क्षणिक सुखाची किंमत नन्दनवनांतील चिरकाल लाभणाऱ्या सुखाहून अधिक असते, असें आता त्याला वाटूं लागलें.

दिव्य त्यागाने लाभलेल्या सुखाचा एकच क्षण मुक्तीच्या आत्यन्तिक सुखाच्या बरोबरीचा असतो.

नन्दनवनांतील सहजलभ्य सुख त्याला दुःखप्रद वाटूं लागलें. त्या स्वर्गसुखाचा त्याला वीट आला. सुखप्राप्तीकरिता जेवढे कष्ट जास्त, तेवढा सुखप्राप्तीचा आनंद अधिक, याची त्याला पुरेपूर जाणीव झाली.

आणि एके दिवशीं कुणालाही न कळवितां त्याने स्वर्गांतून पृथ्वीतलावर उडी घेतली.



तो एक कुशल आणि नामवन्त शिल्पकार होता !

त्याच्यासारखा कलावन्त साऱ्या राष्ट्रांत दुसरा कोणी नव्हता नव्हे, त्याच्यासारखा कुशल मूर्तिकार आजपर्यंत होऊन गेला नाही, असें सर्व जण म्हणत होते; पण तो अत्यंत लहरी होता. राजाने एके दिवशीं त्याला सन्मानाने पाचारण केलें. मोठ्या आदराने त्याला एका उच्चासनावर बसण्यास सांगितलें. राजा म्हणाला, ' शशिकान्त ! उत्कृष्ट शिल्पकार म्हणून तुझें नांव त्रिखंडांत गाजत आहे. मी तुला दहा लक्ष मुद्रा देईन. तुझ्या कौशल्याची परमावधि होऊं दे. माझी एक सुन्दर मूर्ति घडवून दे. '

शशिकान्त हसला आणि मस्तक नम्र करून म्हणाला, ' महाराज ! मी मनुष्याची मूर्ति घडवीत नसतों ! '

राजा क्रोधविवश झाला; यःकश्चित् शिल्पकाराने राजाचा शब्द भरदरबारांत अमान्य करावा म्हणजे काय ? राजा त्वेषाने मुठी वळून म्हणाला, ' मंत्री ! याला कारागृहांत टाका. '

राजाची आज्ञा झाली आणि शिल्पकार बंदींत पडला.

बरेच दिवस गेले !

जगांत आपलें नांव व्हावें, लोकांनी आपणाला अत्यन्त धार्मिक म्हणावें, अशी राजाला उत्कट इच्छा झाली. जगांत आजपर्यंत कोणी बांधलें नाही असें सुन्दर, भव्य व अद्वितीय देवालय आपण बांधावें असें त्याने ठरविलें.

राजाची आज्ञा झाली आणि देवालयाच्या कामाकरिता लागणारें साहित्य येऊन पडूं लागलें. हजारो लोकांना कामाला जुम्पण्यांत आलें. अनेक वास्तु-रचनाकार देवालय उत्कृष्ट व्हावें म्हणून खपत होते. अल्प कालांतच देवालय बांधून पुरेंही होत आलें.

देवालयांत मूर्तीची स्थापना करावयाची होती. अनेक शिल्पकारांना बोलावण्यांत आलें. अशा अद्वितीय देवालयांत स्थापना करावयास तशीच मूर्ति पाहिजे; तरी अशी अप्रतिम मूर्ति शशिकान्ताखेरीज दुसऱ्याच्या हातून होणें अशक्य आहे, असेंच सर्व शिल्पकारांचें मत पडलें.

' अशा अपूर्व देवालयांत शोभून दिसणारी मूर्ति फक्त एकटा शशिकान्तच घडवूं शकेल. ' सर्व शिल्पकारांनी राजास सांगितलें.

राजाची आज्ञा झाली.

शशिकान्ताने देवाची मूर्ति तयार करून देण्याचें आनन्दाने कबूल केलें. कारागृहांतच त्याला दगड व हत्यारें पुरविण्यांत आलीं. रात्रीचा दिवस करून शशिकान्ताने मूर्ति तयार केली. आजपर्यंत इतकी सुन्दर मूर्ति त्याने कधीच घडविली नव्हती ! मूर्ति पाहतांच प्रेक्षक मुग्ध होऊन जात. सर्व शिल्पकारांनी त्याच्या कौशल्याची मुक्तकण्ठाने प्रशंसा केली.

देवालयाचें काम पूर्ण झालें.

राजाची आज्ञा झाली.

प्रतिमास्थापनेच्या महोत्सवाचा तो मङ्गल दिवस ! असंख्य शास्त्री-पण्डित जमा झाले. अन्नसंन्तर्पणें सुरू होतीं. वेदमंत्रांचे घोष ऐकूं येऊं लागले. धडधडत्या यज्ञकुण्डांत आहुती पडूं लागल्या. प्रतिमेची मोठ्या समारम्भानें स्थापना करण्यांत आली. राजाला समाधान झालें.

' असें देवालय त्रिभुवनांत आढळणार नाही ! राजासारखा धार्मिक पुरुष भूतलावर दुसरा नाही ! ' असे धन्योद्गार सर्वांच्या तोंडून निघूं लागले.

राजाची कीर्ति दिगन्त पसरली !

शशिकान्त कारागृहांत दिवस कंण्ठीत होता !

त्याने घडविलेला देव देवालयांत अष्टभोग भोगीत होता !

उत्सवाचा आजचा मुख्य दिवस !

अलोट गर्दी जमली होती. मंडपांत उभें राहण्याची जागा नव्हती. मग गाभाऱ्यांत जाण्याची गोष्ट दूरच. पुरातन आणि जागृत स्थान म्हणून देवाची ख्याती होती. हजारो भक्त देवदर्शनाकरिता जमा झाले होते.

उत्सवाचा आजचा मुख्य दिवस !

सकाळपासून चौघडा झडत होता. सनईतून मञ्जुळ आलाप बाहेर पडत होते. देवाला वेदोक्त अभिषेक झाला. मौल्यवान् पोषाख चढविला. देवाच्या मस्तकावर रत्नखचित मुकुट शोभत होता. नजर ठरत नव्हती त्या रत्नांवर. अंगावरही रत्नजडित अलंकार घातले होते. हे सर्व अमोलिक अलंकार देवाला भक्तांनी मोठ्या भक्तियुक्त अन्तःकरणाने अर्पण केले होते. अलंकारांनी विभूषित झालेली देवाची सावळी मूर्ति मनोहर दिसत होती.

उत्सवाचा आजचा मुख्य दिवस !

सूर्यबिम्ब बरेंच वर आलें आणि देवालयापुढे भक्तांनी देवाचा रथ आणून उभा केला. सुवर्णाचा तीन मजली प्रचण्ड रथ तो ! सभोंवती प्रत्येक खाम्बाला केळीचे खुण्ट बान्धले होते. सर्वत्र तोरणें लटकाविलीं होतीं. नारळांच्या पेंदीहि लोम्बत होत्या. रथाचा कळस रत्नजडित होता. रथांतून आज देवाची मिरवणूक निघणार होती, म्हणून तो आज सुन्दर रीतीने शृंगारला होता.

उत्सवाचा आजचा मुख्य दिवस !

चण्डभानु द्वादश कलेने तपूं लागला आणि भक्तांच्या जयघोषांत देवाची मूर्ति देवालयांतून निघाली. तिची रथांत स्थापना करण्यांत आली. रथाभोवती भयंकर गर्दी झाली. देवदर्शनार्थ वेगाने पुढे येणाऱ्या जनसम्मर्दाला थोपवून धरणें अशक्य झालें. देवाची रथांत स्थापना झाली आणि लोकांचे हात आपोआप जोडले गेले. देवावर पुष्पवृष्टि सुरू झाली. पुजाऱ्याने शिंग वाजविलें. चौघडे झडूं लागले. सनयांतून मञ्जूळ आलाप निघाले. जयघोषाने आकाश निनादून गेलें आणि लोकांनी रथ ओढण्यास सुरवात केली. परमेश्वराची थोडीबहुत सेवा आपल्या हातून व्हावी म्हणून रथ ओढण्याच्या कामीं अहमहमिका सुरू झाली. रथ वेगाने निघाला. रथाबरोबर जनसंमर्दही पुढे जोराने लोटला गेला.

रथ कशाला तरी अडला. भक्तांनी जोर करून रथ ओढला. रथ धाड्कन् पुढे निघून गेला. रथचक्र रक्ताने लाल झालें !

' अरेरे ! कुणी तरी गरीब रथाखाली चुरडला गेला ! ' एक म्हणाला.

' अशीच शिक्षा पाहिजे भिकारड्याला ! ' रथावरून देवाचे लाडके भक्त बोलले.

' रथाखाली मरण आलं ! थोर नशिबाचा ! मोक्ष मिळाला ! ' भाविक म्हणाले.

रथ दुप्पट वेगाने चालूं लागला. बिचाऱ्याचें प्रेत रस्त्यांत पडलें होतें. एकही मनुष्य तिथे थाम्बला नाही. सर्व जण भक्तीची मदिरा प्राशन करून बेहोष झाले होते; उत्सवांत—मिरवणुकींत—सर्वच गुंग झालेले.

देवही रथाधिष्ठित होऊन प्रेमळ भक्तांचे मनोरथ पूर्ण करीत त्यांना दर्शन देत चालला होता.

कारण त्याच्या उत्सवाचा आजचा मुख्य दिवस होता.

राजाचें खाजगी देवालय तें !

देवालय जीर्ण झालेलें. देवाचा वार्षिकोत्सव जवळ येत चालला होता. यन्दाचा उत्सव देवालयाचा जीर्णोद्धार करून मोठ्या समारंभाने करावयाचा व हें कार्य प्रजेने पार पाडावें, अशी राजाने मनीषा व्यक्त केली.

राजाने मनीषा व्यक्त केली !

अधिकाऱ्यांनी प्रजाजनांकडून सक्तीच्या आपखुषीने पैसा वसूल करण्यास सुरवात केली. जो कोणी स्वखुषीने मदत करीना, तो अधिकाऱ्यांच्या व राजाच्या इतराजीस पात्र होऊं लागला.

राजाची इच्छा, अधिकाऱ्यांची कार्यतत्परता व प्रजेची असहाय्यता यांमुळे पैशाचा ढीग पडला.

देवालयाचा जीर्णोद्धार झाला. मोठ्या समारंभाने उत्सव पार पडला. एवढें मोठें काम शेवटास नेल्याबद्दल अधिकाऱ्यांना बिरुदें व बक्षिसें मिळालीं. राजाने देवालयाचा जीर्णोद्धार केला, म्हणून शिलालेख कोरला गेला.

गरीब बापडी देवभोळी प्रजा भक्तिभावाने देवदर्शनास आली. राजाचें खाजगी देवालय म्हणुन देवदर्शनास त्यांना बंदी करण्यांत आली.

'आम्ही पैसे देऊनहि देवा ! तूं आम्हांला अंतरलास ना ?'

प्रजेच्या मुखांतून अन्तःकरण पिळवटून शब्द बाहेर पडले !

पैसा प्रजेचा, देव राजाचा !

## मरीचिका : : : : : : : : १

देवाकरितां पंचपक्वान्नांचा नैवेद्य घेऊन तो लगबगीने चालला होता !

मध्यान्हकालची वेळ !

सूर्य आपल्या प्रखर किरणांनी जीवजन्तूंना सन्त्रस्त करीत होता. चण्डातपाने तप्त झालेले जीव पी पी पाणी पीत होते. क्षुधापीडित जीव इतस्ततः कावऱ्याबावऱ्या नजरेने खाण्यास मिळावें, म्हणून शोध घेत होते.

सूर्यातपाने जिकडे तिकडे लाही फुटत होती.

देवाकरिता पञ्चपक्वान्नांचा नैवेद्य घेऊन तो लगबगीने चालला होता.

तो देवालयाच्या दरवाजाजवळ आला. आंत पाऊल टाकणार, तोंच एक दरिद्री निःशक्त भिकार बालक पुढे झालें. हात जोडून केविलवाण्या मुखाने प्रार्थना करूं लागलें.

" महाराज ! चार दिवस झाले, मी उपाशी आहे. पोटांत तिळाइतकेंही अन्न नाही. भुकेने मी व्याकुळ झालों आहें. मला थोडें अन्न द्या ना ! देव तुमचें भलें करील !"

"चल, दूर हो, शिवशील ना मला !"

देवाला नैवेद्य देणारा श्रीमान् भक्त ओरडला.

पुन्हा अन्नाकरिता जीव याचना करूं लागला. हात जोडून विनवूं लागला. डोळ्यांत आसवें आलीं. त्याच्या पायांवर मस्तक ठेविलें.

अरेरे ! काय झालं हें !

त्याचा अपवित्र स्पर्श त्या पवित्र भक्ताला झाला.

नैवेद्य विटाळला ! भक्त रागाने बेफाम झाला. असहाय्य जिवाच्या मस्तकावर ताडकन् लत्ताप्रहार करून तो एकनिष्ठ भक्त गरजला, 'चाण्डाळा ! चाण्डाळा ! देवाचा नैवेद्य विटाळलास ? '

## मरीचिका : : : : : : : १०

आज भिक्षावळीचा दिवस.

प्रत्यक्ष देवच आज भिक्षेला निघणार !

देव भिक्षा मागणार ?

सकृद्दर्शनीं विसङ्गत वाटणारी ही गोष्ट सांप्रतकाळीं सुसङ्गत झाली होती. यांतील गूढ तत्त्व सामान्य जनांना कळणें अशक्य होतें.

आज प्रत्यक्ष देवाची स्वारी सुवर्णाच्या रथांतून आपल्या लवाजम्यानिशीं व अपरम्पार वैभवानिशीं भिक्षेस निघणार होती.

सारा गाव शृङ्गारला होता.

दूरदूरचे देवाचे एकनिष्ठ भक्त द्रव्याच्या राशी घेऊन उपस्थित झाले होते. गावांत अलोट गर्दी झाली होती.

भगवान् सूर्यनारायणाने क्षितिजाचा पडदा बाजूस सारून रंगभूमीवर प्रवेश केला. शिंगें फुकलीं गेलीं आणि देवाची स्वारी सुवर्णाच्या रत्नजडित रथांतून भिक्षेला निघाली. देवाच्या शरिरावर क्रोडो रुपयांचें जडजवाहिर खचून भरलें होतें. देवाची मूर्ति त्या अलङ्कारांच्या ओझ्याखाली लुप्त झाली होती.

प्रत्येक घरापुढे रथ उभा रहात होता. धर्माधिकारी देवापुढे अधिष्ठित झाला होता. त्याच्यापुढे घरचा मालक—देवाचा भक्त—आपल्या शक्तीबाहेर द्रव्य आणून ठेवीत असे. कुणी कांञ्चन, कुणी मोतीं, कुणी माणिकें, कुणी हिरे, प्रत्यक्ष देवाला घालावयाची भिक्षा बहुमोल नको का असायला? भिक्षेच्या मोलावर धर्माधिकारी दात्याला पुण्यदर्शक बिरुदांची वाटणी करून देत होता. आपणांस अत्युच्च प्रतीचें बिरुद प्राप्त व्हावें म्हणून मानवांची कोण धडपड चालली होती !

अगणित द्रव्य मिळवीत देव चालला होता.

श्रीमन्त भिकारीच तो ! गरिबांना लुटण्याचा त्याला हक्कच होता.

प्रभाकराने नभोमण्डलाचा मध्यबिन्दु नुक्ताच ओलाण्डला.

रथ एका पडक्या घरापुढे थाम्बला.

धर्माधिकारी ओरडला ' विद्यागौरी, देवाला भिक्षा घाल ! '

दुपारच्या वेळीं नशिबाला बोल लावीत विद्यागौरी आपल्या पडक्या घरांत अश्रु ढाळीत बसली होती.

" गत वर्षी याच वेळेला आम्ही किती सुखांत होतों! पण तिकडून कर्ज काढून देवाच्या भिक्षावळींत धन ओतायचं झालं. कर्ज वाढूं लागलें आणि अब्रूकरिता त्यांना आत्महत्त्या करावी लागली. सावकारानें लुटलें, आज अन्नान्न दशा प्राप्त झाली. एकेक दिवस पोटास घासभर अन्नही मिळत नाही. माझ्या एकुलत्या एक रूपमतीस सुद्धा डोळ्यांदेखत उपास घडतात. देवा ! केवळ तुझ्याच पायांत ना माझ्या सुखाची ही राखरांगोळी झाली ? देवा, तूं दीनांचा वाली ना ? मग तुला, तुझ्या नांवाखालीं चालविलेला हा छळ उघड्या डोळ्यांनी, कसा पाहवतो ? " आपल्या लाडक्या १५ वर्षांच्या लावण्यवती रूपमतीस पोटाशीं धरून विद्यागौरी या दुःखद विचारांत गढून गेली होती. तिच्या नेत्रांतून आज सकाळपासून आसवांची माळ झरत होती. या भङ्गलेल्या हृदयाचें आक्रन्दन श्रवण करण्यास देवाला सवड कोठे होती ? तो रथांत बसून बिरुदांच्या वांटणीस हातभार लावीत होता ना ?

' विद्यागौरी, देवाला उशीर होत आहे. अगोदर भिक्षा आण ! ' धर्माधिकारी पुन्हा ओरडला.

' महाराज ! मजजवळ कांहीही देण्यासारखें नाही ' दुःखितान्तःकरणाने हात जोडून ती म्हणाली.

' कांही नाही ? देवाला रिक्त हस्ताने पाठविणार ? तुझ्या धाष्टर्याची कमाल आहे ! देवाला भिक्षा नाही म्हणतेस ? कोण आहे रे ? उचला तिच्या मुलीला आणि ठेवा रथावर. आजपासून रूपमती देवदासी होईल. हीच भिक्षा समजूं ! '

रूपमतीकडे पहात धर्माधिकारी डोळे मिचकावून बोलला.

रथावरील देवभक्तांनी रूपमतीस विद्यागौरीच्या बाहुपाशांतून खास्‌कन्‌ ओढून काढून रथावर जबरीने चढविलें.

रूपमती आक्रोश करूं लागली.

विद्यागौरी तर दुक्खातिशयाने मूर्च्छित होऊन पडली !

धर्माधिकारी या भिक्षेनें खूष झाला.

सकाळपासून उपाशी असलेल्या व देणग्यांच्या वर्षावामुळे अत्यन्त सन्तुष्ट झालेल्या देवाला मधुर ग्लानि आली होती.



कुठं जायचं हें माझं मलाच माहीत नव्हतं !

भ्रमिष्टासारखा पाहिजे तिकडे भटकत होतों मी !

जिकडे पहावं तिकडे सौन्दर्य निथळत होतं ! तृषित नयनांनी मी सौन्दर्याचें आकण्ठ पान करीत होतों. वारा प्यालेल्या वासरासारखी माझी स्थिति झाली. इतके दिवस मला या सौन्दर्याची जाणीव कशी झाली नाही, याचेंच मला राहून राहून आश्चर्य वाटूं लागलें.

लहान बालकासारखा धावत–उड्या मारीतच निघालों मी. वनोपवनांतून बागडतांना किती तरी फुलें मी गोळा केलीं. त्या फुलांच्या माळा करून मी माझी काया शृङ्गारली. भटकतां भटकतां अनेक अमृतफळें मी सेवन केलीं. निर्झरांचें निर्मल नि मधुर जल प्राशन केलें. प्रतिक्षणीं माझा उत्साह अधिकाअधिक वाढूं लागला.

मी किती दूर दूर भटकलों !

दोन प्रहरची वेळ ! मध्यान्हींचा सूर्य जगावर आग पाखडीत होता सारे त्रस्त जीव विसाव्याकरिता वृक्षवल्लरींच्या आश्रयास आले होते.

मी मात्र आनन्दाने—दुप्पट उत्साहाने— भटकत होतों !

भटकतां भटकतां एका वृक्षाजवळ आलों आणि माझ्यांतील चाञ्चल्य गळून गेलें, माझ्या बालिश वृत्ति गम्भीर झाल्या !

वेड्यासारखा भटकणारा मी स्वतःला नीटनेटका करूं लागलों. समोर वृक्षाखाली ती गाढ झोपी गेली होती.

मला वाटलं ती पाताळांतील नागकन्याच असावी !

विश्वांतील सारें सौन्दर्य एकत्रित करून ब्रह्मदेवाने तिला निर्माण केलें होतें. बाल्यांतून तिने तारुण्यांत पदार्पण केलें होतें. कमरेखाली कच्छविहीन

दुकूलवस्त्र तिने परिधान केलें होते. तिच्या कमरेभोवती रत्नमेखला चमकत होती, दण्डांत बाजुबन्द होते, कमरेवरचा भाग वस्त्ररहित होता. केशसम्भारावर मोत्यांची जाळी शोभत होती. पायांतील रत्नखचित नूपुर तिच्या पदकमलांचा रक्तवर्ण खुलवीत होते !

दोन्ही हात मस्तकाखालीं घेऊन आकाशाकडे मुख करून ती झोपी गेली होती. दोन्ही गुडघे किंचित् वर उचललेले होते. श्वासोच्छ्वास करतांना तिचे अर्धवर्तुलाकार स्तनद्वय खालीवर होत होते. तिच्या धनुष्याकार भुवया, निरुन्द, पातळ नि लाल लाल ओष्ठद्वय, गुलाबी गाल, अर्धचन्द्राकृति भाल, उसळतें तारुण्य, सारेंच अपूर्व होतें. मी तिला निरखून पाहिलें आणि माझा बालिशपणा कुठच्या कुठे लुप्त झाला.

किती वेळ मी तिच्याकडे पहात होतों, मला कळलेंही नाहीं. कांही वेळाने ती जागी झाली, आपल्या सुन्दर गात्रांना आळोखे पिळोखे देऊन ती उठून बसली. तिच्या मुखावर अरुणकान्ति विलसत होती. माझ्याकडे तिने रोखून पाहिलें आणि मधुर स्मित केलें ! आणि खडकांतून उड्या मारीत जाणाऱ्या प्रपातासारखी ती अदृश्य झाली.

माझ्या मनोवृत्ति क्षुब्ध झाल्या ! आणि एका क्षणांत मी तरुण झालों !



## मरीचिका : : : : : : : १२

निशेवर शशीचें किती प्रेम !

पण शशी आपलें हृदय निशेपुढे उघडें करावयास लाजत होता. शशीच्या एकनिष्ठ प्रेमाची निशेला जाणीव होती; पण ती लोक-प्रवादाला भिऊन शशीच्या प्रेमभावनांना पडसाद देत नसे; कारण ?

निशा ही सम्राज्ञी होती. अर्ध्या पृथ्वीवर तिची हुकमत चाले. सम्राज्ञीने का कुठे शशीसारख्या यःकश्चित् कलावानावर प्रेम करावयाचे ? आणि त्यांतून शशीकडे नजर टाकायला जावें, तों त्याची रोहिणी त्याला सतत बिलगून असलेली.

निशेच्या निळया महालांत येऊन शशीने रोज तिचें नवनव्या कलांनी रंजन करावें. निरनिराळया समयास अनुरूप अशा रागरागिणी आळवून शशी आपले हृदयभाव व्यक्त करी. त्याच्या सङ्गीत–लकेरींतून अमृत पाझरत असे. शशीच्या गायनाने सारा जीवमात्र मुग्ध होऊन जाई. त्याच्या आगमनाची प्रणयी जन अत्यन्त उत्कण्ठेने वाट पहात असत. एवढा गम्भीर वृत्तीचा सागर, पण तोही शशीच्या सङ्गतीने उचम्बळून येई. अचपळ निशाक्षी हरिणेंही गानलुब्ध होऊन अनिमिष नेत्रांनी शशीकडे पहात, त्याच्या गायनाने शिला पाझरूं लागत, वायू पाङ्गळून जाई, वेगाने धाव-णाऱ्या सरितांचे प्रवाह तुम्बून पाणी तटांत मावेनासें होई.

शशीच्या सङ्गीताने चराचर वस्तुमात्र समाधिसुखाचा अनुभव घेत असे. निशा तर त्याचे गाणें ऐकून वेडावून जाई.

पूर्णिमेला तर शशीने गानप्रभेची कमाल केली. मेदिनी सुधारसांत नहात होती. जिकडे तिकडे मूर्तिमन्त आनन्द नृत्य करीत होता. निशेच्या हृदयांतील अवर्णनीय आनन्द तिच्या सुन्दर मुखकमलावर विलसत होता.

पण शशीला तिने आपलें प्रेमाकुल हृदय शब्दाने व्यक्त करून दाखविलें नाही.

तरुण स्त्रिया कधी आपले हृदयभाव बोलून व्यक्त करतात का ?

बिचारा शशी निराश झाला. शशी निशेचें रंजन करण्याकरिता येई, पण भ्रान्तचित्त झाल्याने त्याला येण्यास अधिकाधिक विलम्ब होई. आता त्याच्या गायनांत कारुण्य प्रगट होऊं लागलें होतें. दिवसानुदिवस तो कृश होऊं लागला. त्याच्या सङ्गीतलकेरींत अमृताची पाझरणी होईनाशी झाली.

निशेला हें सारें दिसत होतें, कळतही होतें; पण तिला बोलण्याची चोरी ! कारण ती सम्राज्ञी होती !

आणि एके दिवशीं शशी निशेच्या सेवेला हजरच झाला नाही.

सहवासापेक्षा विरहाने माणसाची खरी किम्मत जाणवते.

निशेच्या हृदयांत कालवाकालव सुरू झाली. दाट पापण्यावर दुक्खाश्रू तरारले. तिच्या साम्राज्यावर सुद्धा दुक्खाची कृष्णछाया पसरली. तिच्या मुखावरील तेज ओसरून ती कलाहीन दिसूं लागली. शशीच्या दर्शनाकरिता ती उत्कण्ठित झाली. तिला राहवेनाच आणि तिने चोरून शशीला बोलावणें धाडलें,

शशीला खरेंच वाटेना !

भीत भीत त्याने निशेच्या महालांत प्रवेश केला. निशेचें कोमेजलेलें मुखकमल पाहून त्याचें हृदय भरून आलें. तिला आनन्दी करण्याकरिता त्याने एक रागिणी आळविली आणि निशेच्या नाजुक जिवणीभोवती मधुरस्मिताची रेषा चमकली.

शशी रोज येऊन निशेसमोर अधिकाधिक उत्साहाने व कौशल्याने आपले हृदयभाव गायनांतून व्यक्त करी.

निशेला अत्यानन्द वाटे. पण !

अजूनहि असाच क्रम चालू आहे !

# मरीचिका : : : :

मध्यरात्र झाली !

सार्‍या विश्वांत अन्धकार–दैत्यानें उत्पात आरम्भिला होता !

सोसाट्याचा वारा सुटलेला. आकाश कृष्णमेघांनी व्याप्त झालें. मेघांचा प्रचण्ड गडगडाट सुरू झाला होता. मध्येच विद्युल्लतेचा लखलखाट होई. मेघ सहस्त्र करांनी पृथ्वीला आलिङ्गन देऊं लागले. मधूनच मेघांचें शुभ्र हास्य अन्तःकरणाला वेधीत होतें. त्यांनी पृथ्वीला प्रेमरसानें न्हाऊं घातलें. मेघ–धरेच्या मीलनप्रसङ्गी सारा जीवमात्र आपआपल्या निवासस्थानीं विश्राम पावत होता.

पण ती बिछान्यावर तळमळत होती.

तिचा डोळा लागेना !

तिच्या हृदयसागरांत तुफान माजलें होतें.

दारावर टक् टक् असा आवाज झाला !

तिच्या अन्तःकरणाची चलबिचल उडाली !

‘ खरंच बाहेर कुणी आलं आहे का ? का केवळ भास झाला हा ? ’ ती आपल्याशीच उद्गारली.

पुन्हा दारावर टक् टक् असा आवाज झाला !

तिचें हृदय खालींवर होऊं लागलें. तिच्या अंगाला दरदरून घाम सुटला ! तिच्या भावदर्शी दाट पापण्या ओलसर झाल्या.

शयनमंदिरांत दीप मन्द तेजानें प्रकाशत होता.

तिनें बावरलेल्या नजरेनें पाहिलें.

तो गाढ झोपी गेला होता. डावा हात उशाखाली घेऊन गाढ झोपेचा आनन्द तो अनुभवीत होता. झोपी जातांना सुखानुभवानें मुखावर

चमकणारें मधुर हास्य अजूनही अर्धोन्मीलित मुखांतून बाहेर सांडत होतें.

त्याच्या उजव्या हाताचा तिच्या गळयाभोवती विळखा पडलेला होता. त्याचा श्वासोच्छ्वास सावकाश चालला होता. त्याच्या सतेज व सुन्दर मुखकमलाकडे तिने एकवार पाहिलें. लग्न झाल्यापासून तो आपल्याशीं किती प्रेमळपणाने व खुल्या दिलाने वागला, हें तिला आठवलें. शिवाय धर्मबन्धनाने त्याच्याशीं आपण बांधले गेलों आहोंत त्याची तिला पूर्ण जाणीव होती. आपला त्याने धिक्कार करावा, असें तिला कितीतरी वेळा वाटलें, पण तो तिच्यावर प्राणाहून जास्त प्रेम करीत होता.

तिचे गुलाबाच्या पाकळीसारखे असलेले नाजुक ओठ थरथरूं लागले. मुखकमल म्लान झालें.

पण आज तिच्या हृदयाचा खरा स्वामी पूर्वसंकेताप्रमाणे प्रवास आटोपून परत तिच्या भेटीस यावयाचा होता.

दारावर पुन्हा टक् टक् असा आवाज झाला !

तिचें अन्तःकरण चेतनामय झालें !

विझूं पाहणारी दीपज्योत एकदम मोठी होते, तद्वत् तिच्या शरिरांत नवचेतना उसळूं लागली. ती ताडकन् मञ्चकावरून उठली. मञ्चकावरून उडी मारून ती दाराकडे धावतच निघाली. हाताला हिसका बसल्याने तिचा पति जागृत झाला. तिला पाहतांच तो आश्चर्याने स्तम्भित झाला.

दाराकडे जातांना तिच्या पायाला कम्प सुटला.

ती मध्येच धाडकन् पडली !

तो तिच्याकडे सम्भ्रमित होऊन पहात होता !

दारावर पुन्हा टक् टक् असा आवाज झाला !

---

छायेसारखी मृदु ! तिला पाहतांच त्याला वाटलें की, आपण स्वप्नांतच आहोंत. तिने त्याच्या जीवसरांत लहरी उत्पन्न केल्या. तिने निळी साडी परिधान केली होती आणि तीमधून प्रकाश-किरणासारखी तिची सौन्दर्यप्रभा फाकली होती. सन्ध्यासमयीं उगवणाऱ्या चतुर्थीच्या चन्द्राची त्याला स्मृति झाली.

त्याच्या तेजस्वी व हसऱ्या मुखाकडे पाहतांच तिच्या हृदयाची एकता-नता भङ्ग पावली.

ती हसली आणि तिच्या नयनकटाक्षांतून अमृत पाझरल्याचा त्याला भास झाला. तिच्या दृक्क्षेपांत अनेक रङ्ग व विविध भाव दृग्गोचर होत होते.

प्रणयाची लाट असह्य झाल्याने तिने आपले नेत्र मिटले.


कुठूनशी हाक आली आणि ती दचकली, कावरीबावरी झाली आणि अवचित निघून गेली. पारध्याचा वास येतांच पळणाऱ्या हरिणीचा त्याला भास झाला.

विरलेलें जणु स्वप्नच !

× × × ×

वादळानन्तरची अष्टमीची रात्र. चन्द्राने निळ्या पटलाआडून आपलें मुख बाहेर काढलें आणि तिच्या केशकलापाचें चुम्बन घेतलें. ती कुणाची तरी उत्कण्ठेने मार्गप्रतीक्षा करीत होती.

निसर्गाची शान्तता तिला असह्य झाली. ' या आडरस्त्याने फुलांचा गुच्छ



घेऊन तो येईल काय ? ' ती आपल्याशींच विचार करूं लागली– ' पण आता या चन्द्राची काय जरुरी ?– हा आकाशांत अजून कां घोटाळतो आहे ?... बाबांना चुकवून मी आलें. त्यांना कळल तर ? त्यांतून या उनाड भटक्यास भेटायला आलें मी–हो बाबांनी माझ्याकरिता तीन नवरदेव आणलेत– तो काञ्चनराज– मेल्याच्या तोण्डांत एक दात असेल तर शपथ. नदीवर लांकडें गेलीं तरी लग्नाची इच्छा करतो ! आणि बाबा म्हणतात, की ' तो कुबेरासारखा श्रीमान आहे. ' मला काय संपत्तीशीं लग्न करायचे आहे ? तो वन्सत म्हणे नामवन्त लेखक आहे ! अशाची पत्नी होण्याने मला ही आपोआपच समाजांत मानमान्यता मिळेल; पण हे शब्दसृष्टीचे ईश्वर

हृदयाच्या श्रीमन्तीच्या बाबतींत कफल्लक असतात, अगदीच नाजूक नि शिष्टाचारप्रिय! त्याला तारुण्याचा अविचारी बेफामपणा कसा तो ठाऊक नाही आणि तो विद्याचार्य केवढा मोठा शास्त्रज्ञ ! सारं जग त्याच्या शोधाची वाहवा– प्रशंसा करीत आहे. प्रत्येक वस्तुमात्राचं सूक्ष्म पृथक्करण करणाऱ्या विद्याचार्याला माझ्या हृदयाचं पृथक्करण मुळीच करतां याव याचं नाही. पुस्तकांतल्या कीटकाला तरुणीच्या हृदयाच्या आकाङ्क्षा कुठून कळणार ? या तिघांकडे माझं मन धाव न घेतां त्या उर्मट, भटक्या मधुकराकरिता माझं मन का बरं झुरतं ? हिमावरणाखाली कमळं कधी तरी फुलतील काय ? पण किती वेळ मी त्याची वाट पाहूं ?"

किती तरी वेळ ती विचार करीत होती.

चान्द ढळून झोपीं गेला !

शरविद्ध पक्ष्यांप्रमाणे हिवाळयांतील पर्णांनी फडफडाट केला, बोचक हिमवायूची झुळूक तिच्या तरुण हृदयाला चाटून गेली. आपल्या सुगन्धी केशकलापावरून बोटं फिरवून तिने इकडे तिकडे पाहिलें.

सगळीकडे निराशेसारखा गाढ अन्धकार पसरला होता. पाण्याबाहेर लाटेने फेकलेली मासळी लाटेची वाट पहात होती !

कुठूनशी वायूची मन्द झुळूक आली आणि तिच्या हृदयबासरींतून गोड आलाप बाहेर पडूं लागले.



## मरीचिका : : : : : : : : १५

सारी नगरी आज प्रफुल्ल दिसत होती. जिकडेतिकडे मङ्गल वाद्यांचा मञ्जूळ ध्वनि ऐकूं येत होता. नगरींतील सर्व रस्त्यावर केशर-कस्तुरिकेचे सडे टाकले होते. चित्रविचित्र राङ्गोळयांनी रस्ते सुशोभित केल्याने अतीव मनोहर दिसत होते. मार्गामधून ठिकाठिकाणीं सुवासिक पुष्पांच्या माळा बांधल्या होत्या. प्रत्येक गृहाच्या व प्रासादाच्या द्वारावर मोत्यांचीं तोरणें लटकत होतीं. गोपुरावर रङ्गीबेरङ्गी पताका फडकत होत्या. नगरीच्या पश्चिमद्वारापासून राजप्रासादापर्यन्तचा राजमार्ग तर कमालीचा शृङ्गारला होता. मार्गांत मधूनमधून भव्य कमानी उभारण्यांत आल्या होत्या. नगरींतील सुन्दर आणि तरुण स्त्रिया मार्गांतून लगबगीने जातांना दिसत होत्या. कोणी दुकूल, तर कोणी शालू, तर कोणी पैठण्या परिधान केल्या होत्या. घाईने पण ठेक्यांत चालल्यामुळे त्यांच्या पायांतील नूपुरांचा ध्वनि मार्गावरून जाणाऱ्यायेणाऱ्यांचें चित्त वेधून घेत होता. त्यांच्या अङ्गावर रत्नांच्या अलङ्कारांची प्रभा क्षणोक्षणीं फाकत होती. सर्व नागरिकांनी मनोहर व उंची पोषाख धारण केले होते. सर्वांच्या मुखांवर आज औत्सुक्य आणि आनन्द विलसत होता. सारी नगरी आज फुलून गेली होती.

कारण आज तिचें स्वयंवर होतें !

ती राजाची अत्यन्त लाडकी आणि एकुलती एक कन्या होती. कवीला वर्णन करतां येणार नाही, कुशल चित्रकाराला आपल्या शलाकेने रङ्गवितां येणार नाही, अगर कुणाही शिल्पकाराला तिची मनोरम मूर्ति घडवितां येणार नाही, इतकी ती सुन्दर होती. दीपज्योतीवर पतङ्गांनी झेप घालावी, तद्वत् देशोदेशींचे शेकडो राजपुत्र आज तिच्या स्वयंवरार्थ उपस्थित झाले होते. अजूनपर्यन्त तिचें पूर्ण दर्शन कुणालाही झालें नव्हतें. ज्यांना ज्यांना

तिचें ओझरतें दर्शन झालें होतें, ते स्वतःला धन्य समजत होते व सर्वसाधारण जनता त्यांना महाभाग्यवान् समजत असे. पण अजून तिची प्राप्ती कुणालाहि झाली नव्हती. तेव्हा तिच्या स्वयंवरार्थ अलोट गर्दी झाली यांत नवल नाही.

राजप्रासादापुढील विस्तीर्ण प्राङ्गणांत टोलेजङ्ग मण्डप उभारण्यांत आला होता. सुवर्णाने मढविलेल्या स्तम्भांवर मौल्यवान् रत्नें जडविलीं होतीं. रेशमी छताला मोत्यांच्या झालरी लावल्या होत्या. मण्डपांत ठिकठिकाणीं अत्यन्त सुन्दर पुतळे उभारले होते. स्वयंवराकरिता उपस्थित झालेल्या सर्व लोकांकरिता शेकडो मौल्यवान् आणि सुन्दर आसनें माण्डून ठेविलीं होतीं. कारंज्यांतून उडणाऱ्या सुगन्धी द्रव्याच्या परिमलाने सारा मण्डप दरवळून गेला होता. मण्डपाच्या मध्यभागीं राजाचें रत्नजडित सिंहासन होतें.

रङ्ग उत्कृष्ट रीतीने सिद्ध केला होता.

सूर्योदयाबरोबर दुन्दुभिध्वनि झाला आणि मण्डपाकडे जनसमूह लोटूं लागला. अनेक देशचे राजपुत्र, विद्वान्, शूर, कलावान्, शास्त्रज्ञ आणि धनिक त्या ठिकाणीं हजर झाले होते.

कारण आज सर्वांच्या नशिबाची परीक्षा होती. जमलेल्या "जनसमूहांत प्रत्यक्ष कुबेराने लाजेने मान खाली घालावी असे धनवान् लोक ' तिने आपणाला माळ घालावी ' म्हणून उपस्थित झाले होते. राष्ट्रकार्यार्थ ज्यांनी सर्वस्वाचा त्याग केला आहे असे राष्ट्रसेवक तिच्या प्राप्तीच्या आशेने तेथे प्राप्त झाले होते. मानवी बुद्धीला आश्चर्यचकित करणारे व अद्वितीय शोध लावून मानवी जीवित अधिक सुखकर करणारे अनेक शास्त्रज्ञ तेथे जमले होते. ज्यांनी आपल्या ललितलेखनाने सर्व जगाला मन्त्रमुग्ध करून टाकलें होतें, असे साहित्यसम्राट् तिची अभिलाषा धरून तिथे आले होते. आपल्या काव्यवाणीने ज्यांनी राष्ट्राला दिव्य सन्देश देऊन कार्यप्रवण केलें

होतें, असे महाकवी तिची आकाङ्क्षा धरून मंडपांत प्रमुख स्थानीं विराजमान झाले होते. आपल्या कुशल्याने ज्यांनी प्रतिसृष्टी निर्माण करून कलाप्रेमी जनांना वेडें करून सोडलें होतें, असे चित्रकार तिने आपणांवर एक कृपा-कटाक्ष फेकावा, ही इच्छा धरून तिथे बसले होते.

आपल्या धडाडीने मानवी कल्पनेला अगम्य अशीं कृत्यें करून दाखवि-णारे अनेक तरुण रङ्गांत ठिकठिकाणीं विलसत होते. भिन्न व्यवसायांच्या–भिन्न वयांच्या–भिन्न दर्जांच्या–भिन्न वर्णांच्या–असंख्य लोकांनी सारा मण्डप फुलून गेला होता.

सर्व जण राजाची मोठ्या उत्सुकतेने वाट पहात होते. इतक्यांत दुन्दुभि-ध्वनि झाला. भालदार पुकारले, चोपदार ललकारले आणि राजाची स्वारी सभामण्डपांत प्राप्त झाली. राजा आल्याबरोबर सर्वांनी खडी ताजीम दिली. राजा सिंहासनावर विराजमान झाला. वैतालिक व स्तुतिपाठक यांनी राजाचें यशोगान गाइलें. सर्व रङ्ग सिद्ध झाला. राजाने हुकूम केला आणि–

तिने रङ्गांत प्रवेश केला. सारी सभा चित्रासारखी तटस्थ झाली. सर्व सभाजन तिच्याकडे विस्फारित नेत्रांनी पाहूं लागले. तिचें लावण्य आणि तेज पाहून ते स्तिमित झाले; कारण ती तशीच अद्वितीय रूपवती होती. तिने साधें धवल वस्त्र परिधान केलें होतें, तरी तिचें सौन्दर्य अधिकच खुलून दिसत होतें. शरीरावर तिने अलङ्कार धारण केले नव्हते; पण ती त्या सभेचा एक बहुमोल अलङ्कार होती.

राजाने आज्ञा केली. एकेक जण आपली योग्यता पटवून देण्याकरिता आपल्या पराक्रमाचें रसभरित वर्णन करूं लागला. एक राजपुत्र उठला आणि बोलला, 'मी सारें जग पादाक्रान्त केलें आहे.' तिच्या मुखावर स्मित झळकलें. तोंच एक पण्डित लगेच उठून म्हणाला, 'मी सर्व सभा जेहेत्ते कालाचे ठायीं जिंकल्या असून हीं पहा मी मिळवलेलीं अजिंक्यपत्रें !' त्याने

तिच्यापुढे अजिंक्यपत्रांचे भेंडोळें फेकलें. ती हसली, पण त्यांत उपहासाची छटा दृग्गोचर होत होती. एक शास्त्रज्ञ उठून बोलले, ' मी जर शास्त्रीय शोध लावले नसते, तर हल्लीइतकी सर्व जनता सुखी होणें शक्य नव्हतें. अर्थात माझी योग्यता असामान्य आहे.' तिने किंचित् मान लववली; पण—

तिच्या कपाळावर बारीकशी आठी पडली. प्रत्येक जण आपण दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठतर आहोंत, हें पटविण्याकरिता लाम्ब लाम्ब गप्पा मारीत होता. तिला हा प्रकार आवडल्यासारखें दिसलें नाही. सभागृहांत स्वतःचें वर्णन स्वतः करण्यांत अहमहमिका सुरू झाली. हा प्रकार पाहून एका तरुणाला मात्र उद्वेग उत्पन्न झाला. आपली आपण स्तुती करणाऱ्या या वाचाळांचा त्याला राग आला. तिरस्काराची लहर त्याच्या मुखावर येऊन गेली. त्याच्या विस्तीर्ण कपाळावर आठ्या पडल्या. त्याच्या पाणीदार नेत्रांत रक्तिमा चढली. त्याने खालचा ओठ दातांनी चावला. तो त्वेषाने एकदम उठून उभा राहिला. सर्वांचें लक्ष त्याच्याकडे वेधलें. तिने आपली दृष्टि त्याच्याकडे लावली. तो वर्णाने साधारण काळासावळा होता—त्याच्या मुखावर एक प्रकारचें तेज विलसत होतें. त्याच्या मुखावरील बेदरकारपणा त्याच्या निधड्या छातीची साक्ष देत होता. सर्व सभाजनांचा त्याने तीव्र शब्दांत धिक्कार केला. तिच्या प्राप्तीची लवमात्र आशा न धरतां तो सभागृहांतून बाहेर जाऊं लागला. सर्व सभाजनांनी त्याचा उपहास केला. त्याचें धैर्य पाहून तिला मात्र सन्तोष झाला. ती धावतच त्याच्याकडे गेली आणि त्याच्या गळ्यांत तिने माळ घातली. जमलेल्या लोकांनी एकच हलकल्लोळ उठवून दिला. ज्याला जें जें हाताला सापडेल तें तें घेऊन तो त्याच्यावर धावून गेला. ' तो कीर्तीच्या मागे लागला नाही, म्हणून तिने त्याला माळ घातली ' असें सुज्ञ म्हणूं लागले. सर्व जण त्याच्या पाठीस लागले; पण तिला घेऊन तो केव्हाच पसार झाला होता. राजाने रङ्ग विसर्जन केला. सारे लोक हात चोळीत आपापल्या ठिकाणीं परत गेले.

सारा रङ्ग सिद्ध झाला.

छप्पन् देशांतील विद्वान् वैदिक आपापल्या योग्यतेनुरूप आसनाधिष्ठित झाले होते. साऱ्यांच्या मुखांवर औत्सुक्य व्यक्त होत होतें.

मध्यभागीं राजाकरिता उच्च रत्नजडित सिंहासन माण्डलें होतें. सिंहासनावर छत्र विलसत होतें. राजाच्या सिंहासनापुढेच दोन उच्च आसनें माण्डलीं होतीं.

भालदार–चोपदारांच्या ललकाऱ्यांत राजाने सभागृहांत प्रवेश केला. वैदिकांचे आशीर्वाद घेत, माण्डलिकांचे मुजरे स्वीकारीत राजा सिंहासनाजवळ आला. सभागृह एकदा नजरेखाली घालून तो सिंहासनावर विराजमान झाला. सर्वांनी उच्च स्वरांत राजाचा जयजयकार केला. सारें सभागृह त्या जयजयकाराने दणदणून गेलें.

दोन पण्डितांना रङ्गांत मोठ्या मानाने आणण्याची राजाने आज्ञा केली.

दोन पण्डितांनी राजाज्ञेप्रमाणे सभागृहांत प्रवेश केला. साम्यापेक्षा विरोधानेच दोघेही अधिक शोभत होते. दोघांच्या पोशाखांत, वागण्यांत व बोलण्यांत जमीनअस्मानाचें अन्तर दिसून येत होतें.

राजाने दोघांनाही सन्मानपूर्वक उच्चासनावर बसविलें. राजाने स्वतः न्यायाधिशाची भूमिका स्वीकारली.

वादाला तोण्ड फुटलें !

' कला आणि नीति ' यासारखा महत्त्वाचा विषय. दोघेही वादकुशल पण्डित. दोघांच्या बाजूला मोठमोठे विद्वान्. वादाला चाङ्गलाच रङ्ग चढला.

सारे विद्वान् लोक या वादविवादांत भान विसरून गेले.

× × ×

सभागृहाला दरिद्री प्रजाजनांनी वेढा दिला.

‘ आम्हांला खायला अन्न नाही. आमचीं बायकामुलें अन्नावाचून तडफडत आहेत.’ एक जण कळवळून ओरडला.

‘ अधिकाऱ्यांनी आम्हाला पिळून काढलें. आमची अन्नान्नदशा केली ! ’ दुसरा घसा फोडून बोलला.

‘ जुलूम, जुलूम ! आम्ही किती जुलूम सहन करावा ? आमच्या घरांत आमची काडीवरही सत्ता असूं नये ? आमचें घर आम्हांला कारागृह झालें आहे. यांतून आम्हांला कोण सोडविणार ? ’ बोलतां बोलतां व्याकूळ होऊन तो भूमीवर पडला.

‘ हाडाचीं काडें नि रक्ताचें पाणी केलें, विद्या संपादिली, पण पोट भरतां येईना; घरभेदे लक्ष्मीच्या कृपेस पात्र झाले. आम्ही सत्याने वागत असून अन्नास मोताद झालों आहोंत.’ सभामण्डपाभोवती गर्दी करणारे लोक यज्ञांत बली दिल्या जाणाऱ्या पशूंच्या आर्त स्वराने ओरडले.

सभेमध्ये वादविवादांत साऱ्यांच बुद्धिमान् डोकीं गढून गेलीं होतीं. एवढ्या सुन्दर व महत्वाच्या विषयावर वादविवाद सुरू असतां बाहेर केवळ पोटासाठी—आणि कुत्रीं सुद्धा पोट भरतात !— चाललेला कोलाहल पाहून साऱ्याच विद्वानांचीं डोकीं गरम झालीं. हें पाहतांच राजाने हुकूम केला——

गरिबांच्या पाठीवर कोरडे व मस्तकावर लाठया बसूं लागल्या.

त्यांच्या हृदयभेदक किंकाळयांनी सारा सभामण्डप हादरून गेला.

सारे दरिद्री हाकलण्यांत आले.

अनन्त बृहस्पतींनी भरलेल्या सभामण्डपांत स्मशानशान्तता नांदूं लागली !

दिवसभर धरणीची अङ्ग मोडून मशागत करावी व रात्रीं आपल्या मुलांबाळांसमवेत आनन्दाने भाजीभाकरी खाऊन खाली जमीन व वरती आकाश अशा स्थितींत निर्भर निद्रासुखाचा अनुभव घ्यावा, हाच त्याचा दिनक्रम असे. जिथे खावयास पोटभर अन्न नाही, ल्यावयास धड वस्त्र नाही, अशाच ठिकाणीं न्यायी व दयाळू परमेश्वर आपल्या कृपेची खैरात करतो व दरिद्री जिवाला अधिक काळजीच्या खाईत लोटतो.

वर्षभर कुटुम्बांतील साऱ्या लहानथोर व्यक्तींच्या सहाय्याने त्याने अत्यन्त परिश्रम करून जें शेत पिकविलें, आपल्या रक्ताचें पाणी शिम्पून जें शेत वाढविलें, त्याची आज मळणी होऊन मोत्यांची रास खळ्यांत पडली होती. आपल्या परिश्रमांचें सार्थक झालेलें पाहून, त्याला आनन्द वाटला. यन्दा मुलांबाळांच्या पोटाची पंचाईत नाही, या कल्पनेंत तो गुङ्ग होता.

कल्पना आणि प्रत्यक्ष यांत पीसपाऱ्याचें अन्तर असतें ! सावकाराने सन्ध्या-काळींच कर्जाप्रीत्यर्थ सारें धान्य जप्त करून नेलें. अकल्पित अशनिपात व्हावा, त्याप्रमाणे त्याला झालें. रिकाम्या खळ्यांत आनन्दाने खेळणाऱ्या अजाण बालकांना पाहून त्याची कम्बरच खचली.

सावकाराची करुणा भाकून आपलें धान्य परत मिळविण्याची फोल आशा धरून तो रात्रीं सावकाराकडे निघाला. त्याच्या नेत्रांत असहाय्यता, चालींत दैन्य व शरिरावर दारिद्र्य स्पष्ट प्रतीत होत होतें. त्याने दारांत पाऊल टाकलें, तों दिवाणखान्यांतून सारङ्गी व चाळ यांचा मधुर स्वर त्याच्या कानावर पडला.

दिवाणखान्यांत एका प्रसिद्ध नर्तकीचें कलापूर्ण नृत्य चाललें होतें. मूर्तिमन्त

कलेचा आविष्कार ! सारे भाग्यवान् रसिक कलानन्दाचें सुख अनुभवीत होते.

शेतकरी अंत निघाला. देवडीवरील शिपायाने धक्के मारून त्याला बाहेर हाकलून दिलें. अवमानित शेतकऱ्याच्या नेत्रांतून रक्ताश्रु ठिबकले; पण अन्धारांत ते कुणाला दिसणार ? माडीवर दिवाणखान्यांत नृत्याङ्गनेच्या मधुर कण्ठांतील भावपूर्ण गोड लकेर रसिकांच्या हृदयाचा ठाव घेत होती ...

घनान्धकार खोल निःश्वास टाकून उद्गारला—

' जीवन आणि कला ! '



आज देवाधिदेवांची स्वारी येणार !

अरुणोदयाने कलिका प्रफुल्लित होतात, तद्वत् देवाधिदेव येणार या वार्तेने जीवमात्रांचीं हृदयें फुलून गेलीं.

अनेक जन्मींचें भाग्य फळाला आलें, म्हणूनच या पुण्यात्म्याचे पाय या भूमीला लागणार!

सारा गाव झाडून स्वच्छ करण्यांत आला. भक्तगणाने मार्गावरून फुलांच्या पायघड्या अन्थरल्या, कमानी उभारल्या, तोरणें लटकावलीं, जिकडे पहावें तिकडे आनंद–चैतन्यच सळसळत होतें. मध्याह्न–घटकेला देवाधिदेवाची स्वारी येणार !

गावकऱ्यांनी रथ किती कलापूर्ण रीतीने शृङ्गारला होता !

घरापुढून मोकळा रथ गेला. माझें अन्तःकरण भरून आलें आणि मी नकळत हात जोडून त्या रथाला प्रेमाने वन्दन केलें. रथाच्या मागून अनेक सुवासिनी पञ्चारती घेऊन ओवाळण्याकरिता निघाल्या. लहान बालकांपासून वृद्धांपर्यंत सारे जण देवाधिदेवाच्या स्वागताकरिता—दर्शनाकरिता उत्सुक झाले होते. साऱ्यांच्या मुखांवर आनन्द व पायांत चापल्य दिसून येत होतें. प्रत्येक जण आपापलें नियोजित कर्तव्य बजावण्यास तत्पर व उत्सुक होता.

लहान मुलें हातांत हात घालून मार्गाने गोड गाणीं गात निघालीं. आज सर्वांनीच देवाधिदेवाला आवडणारा पाण्ढराशुभ्र साधा पोशाख केला होता. देवाधिदेवाच्या पूजनाकरिता कुणी फुलें, कुणी हार, कुणी वस्त्रं, कुणी रत्नमाला जमविल्या होत्या. कुणी कांही, कुणी कांही, सर्वांनी बहुमोल वस्तु अत्यन्त प्रयासाने आणल्या होत्या.

जिकडे तिकडे कोलाहल माजला होता.

मी मात्र माझ्या झोपडींत अश्रु गाळीत बसलें होतें.

कारण मी अस्पृश्य होतें.मला मङ्गलोत्सवांत समाज मिसळूं देण्यास तयार नव्हता.

पहाटेस मी उठलें! माझ्या जीर्ण झोपडीपुढचें अङ्गण स्वच्छ सारवून त्यावर राङ्गोळी काढली. रानांतून फुलें गोळा केलीं व त्यांच्या माळा गुम्फून झोपडीसभोवती लटकावून दिल्या. देवाधिदेवाला ओवाळण्याकरिता तेल-वातीने पणती सज्ज केली. पूजेची सारी तयारी केली, पण माझी पूजा देवाधिदेव कसे स्वीकारणार ?

मी तर बोलून चालून अस्पृश्य, पतित आणि त्यांतून महारोगी! गावांतून मला कोणी फिरकूंही देत नव्हता.

मला वेडीला देवाधिदेवांचें दर्शन कुठून होणार ?

तशीच जाऊन दुरून दर्शन घेईन म्हटलें, तर अङ्गावर लज्जारक्षणास धड वस्त्रही नाही; त्यामुळे दिवसा घराबाहेर पडावयाची चोरी.

मासळीसारखी तळमळत होतें मी !

सनयांचा मञ्जूळ स्वर माझ्या हृदयाला झोम्बत होता. स्त्रियांच्या गोड गळ्यांतून निघणारे मधुर गीततरङ्ग माझें हृदय व्याकूळ करीत होते.

मला त्या दिव्य मूर्तीचें दर्शन घेण्याचें भाग्य नाही ! गत जन्मीं मीं फार पातक केलें होतें काय ?

दुक्खातिरेकाने गुडघ्यांत मान घालून मी किती तरी अश्रु ढाळले !

+ + +

'माई ! तहान लागली आहे, थोडं पाणी मिळेल का ?' कुणी तरी मधुर स्वरांत प्रश्न केला.

मी दचकून वर पाहिलें.

दाराजवळ एक संन्यासी उभा होता. त्याच्या मुखावर दिव्य तेज

विलसत असून तो मजकडे स्नेहल दृष्टीने पहात होता.

तृषित संन्यासी जलाची इच्छा करीत असलेला पाहून मी चटकन् उठलें; पण तत्क्षणींच मी पतित आहें, याची मला जाणीव झाली.

त्या दिव्य महात्म्याला फसवावयाचें !

माझें हृदय झरझर उतरलें ! धीर करून मी सांगितलें—

'महाराज ! मी एक अस्पृश्याची मुलगी आहें !'

'बाळ ! तूं मला मुलीच्या ठिकाणीं आहेस. तूं माझ्या जातीची-मनुष्य जातीची--आहेस !' किती गोड भाषण त्यांचें तें !

'महाराज ! आंत येऊन या आसनावर बसावें' असें म्हणून मी आसन पुढे केलें.

ती दिव्य मूर्ति आंत येऊन त्या आसनावर बसली.

मी लगबगीने खापराच्या माठांतील पाणी घेऊन बाहेर आलें आणि तत्क्षणींच 'मी महारोगी आहें,' याची मला जाणीव झाली.

उत्साह पार मावळला, कम्बर खचली, मस्तक फिरूं लागलें आणि मी तशीच बेशुद्ध पडलें.

डोळे उघडून मी इकडे तिकडे पाहिलें.

'बाळ ! शुद्धीवर आलीस ? आता तुला बरं वाटेल ! घाबरूं नको हं !' मला वारा घालीत ती विभूति अमृतवाणीने बोलली.

'देवाधिदेवांचा जयजयकार असो !' झोपडीबाहेर गर्जना झाली.

मी आश्चर्य-चकित मुद्रेने त्या विभूतीकडे पाहूं लागलें.

'कोण देवाधिदेव ! आणि माझ्या झोपडींत ?' मी बावरून उद्गारलें ! माझ्या अन्तरांत आनन्द व दुक्ख या भिन्न भावनांचा कल्लोळ उडाला.

भावनेच्या भरांत मी त्या विभूतीच्या पायाला घट्ट मिठी मारली.

'बाळ ! देवता आहेस तूं, तुझं कल्याण होईल !'

माझ्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवीत ते बोलले.

त्यांच्या पुण्यस्पर्शाने मी पुनीत झालें !

# मरीचिका : : : : : : : : १९

" देवाधिदेवाच्या मन्दिराचा मार्ग मला दाखवाल का हो ?" मोठ्या उत्सुकतेने मी एका वाटसरूला विचारलें. लांबच्या प्रवासामुळे मी धुळीने माखून गेलों होतों. माझ्या अवताराकडे पाहून आश्चर्याने त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या. तुच्छतापूर्वक उपहासगर्भ हास्य करून उत्तर न देतांच तो पुढे झटकला. अनेकांना मी काकुळती येऊन विचारलें; पण माझ्या परमेश्वराच्या मन्दिराकडे जाण्याचा मार्ग कोणीही मला दाखविला नाही. कोणी उत्तराची टाळाटाळ केली, कोणी मला वेड्यांतच काढलें, तर कोणी मला परत घरीं जाण्याचा उपदेश केला; पण माझा निश्चय कायमच होता. माझ्या ध्येयापासून मी परावृत्त झालों नाही.

मी प्रवास करीत होतों.

किती तरी दिवस मी सारखा प्रवास करीत होतों. क्रूर श्वापदांनी भरलेल्या अनेक दुर्गम अरण्यांतून मी प्रवास केला. वेगवान् नद्यांमधून पोहून पार झालों. गगनाला भेदून जाणारे अत्युच्च पर्वत मोठ्या कष्टाने ओलाण्डले, विस्तीर्ण माळरानें तुडविलीं, अनेक अज्ञात प्रदेशांतून प्रवास केला.

प्रयत्नान्तीं परमेश्वर !

अनेक हालअपेष्टा सोसल्यावर माझ्या भाग्याची सुप्रभात झाली. अपूर्व भाग्याने माझ्या देवाधिदेवाच्या मन्दिराच्या कळसाचें मला दर्शन झालें. दुरून मन्दिराचा सोन्याचा कळस अवलोकन केला आणि माझें हृदय आनन्दातिशयाने भरून आलें. अदृष्टपूर्व दृश्य पाहण्याचें भाग्य आज मला लाभणार !

प्रवासाने मी थकून–गळून गेलों होतों; पण नवोत्साहाने झप्झप् पावलें टाकीत उरलेला मार्ग झपाट्याने मी कापूं लागलों. दुरून देवालय अव-

लोकन केलें. त्या मन्दिरासभोवती भक्तजनांची किती गर्दी झाली होती !

मन्दिरांत प्रवेश करण्यासाठी भक्तजनांची कोण यातायात ! आंत प्रवेश होणें बरेंच मुष्किलीचें काम होतें. हातांत तीक्ष्ण शस्त्रें घेऊन अनेक द्वार-पाल आपलें कार्य तत्परतेने करीत होते. द्वारपालांच्या ओळखीचे भक्तगण आंत बेलाशक प्रवेश करीत होते. कोणी विद्वत्तेच्या जोरावर, तर कोणी द्वारपालांची मूठ दाबून प्रवेश करीत होते.

माझा विचित्र, मळकट, जीर्ण पोशाख व बावळी मूर्ति पाहून द्वारपाल थोडा वेळ गाङ्गरून गेला आणि तेवढ्या वेळांत मी चटकन् आंत जाऊन भक्तजनांत अदृश्य झालों.

जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट दिसत होता. पुष्पांच्या परिमळाने सारा मण्डप दरवळून गेला होता. भक्तजनांची एकच गर्दी उडून गेली होती. तेथे शान्ततेचा लवलेशही नव्हता. परमेश्वरस्वरूपाचें ज्ञान-दर्शन व्हावें, हाच हेतु धरून सारे भक्त तेथे उपस्थित झाले होते; पण मन्दिरांत प्रविष्ट होतांच त्यांच्या हेतूची -ध्येयाची- त्यांना विस्मृति पडली होती. आपापली स्तुति करण्यांत -आपला मोठेपणा वर्णन करण्यांत- सर्वांहून आपण श्रेष्ठ आहोंत- आपले सिद्धान्त काय ते खरे-आपणांशिवाय बाकीचे सारे मूर्ख- हेंच ठरविण्यांत प्रत्येकाची अहमहमिका सुरू होती.

सूर्याच्या अभावीं नभःप्राङ्गणांत नक्षत्रांचीच गर्दी उडावी, यांत नवल तें काय ?

कोणी साहित्यिक एकदम आवेशाने स्वमतप्रतिपादन करीत होता, तर कोठे कळप करून अनेक साहित्यिक शौण्ड प्रतिपक्षावर गिधाडासारखे तुटून पडून त्याला फाडून खाण्याच्या विचारांत होते. कोठे एखादा भाविक परमेश्वराचे गुणानुवाद करण्यांत तल्लीन होऊन गेला होता, तर जवळच कित्येक जण मिस्किलपणाने त्याची कुचेष्टा करीत होते. एवंच, तेथें गम्भी-

रता, प्रेमळपणा, सहानुभूति, खेळाडूपणा व दया या उच्च मानवी गुणांचें अस्तित्व अभावानेच भासमान होत होतें.

देव बिचारा भक्तांनी वाहिलेल्या पुष्पमालांच्या भाराखालीं गुदमरून गेला होता, साहित्यिकांच्या वाग्बाणांनी जर्जर होऊन पडला होता. ज्यांच्या कल्पनेंतून परमेश्वराची उत्पत्ति झाली, तेच त्याची अवहेलना करूं लागले, तर त्या बिचाऱ्याने काय करावें ? आत्महत्त्येच्या विचारांत दिसला तो !

मी विमनस्क होऊन पुढील दालनांत प्रवेश केला !

इन्द्रधनुष्याच्या विविध रङ्गांनी तें दालन रङ्गविलें होतें. भिन्न भिन्न रङ्गांच्या नयनमनोहर प्रकाश--किरणांनी सारें दालन प्रकाशित झालें होतें. भिन्तींवर मोठमोठीं नयनमनोरम चित्रें काढलीं होतीं. ठिकठिकाणीं सौन्दर्य-पूर्ण शिल्पप्रतिमा प्रेक्षकांचें चित्त आपणाकडे वेधून घेत होत्या. सङ्गीतलह-रींनी सारा रङ्ग व्यापून गेला होता. जिकडे पहावें तिकडे सौन्दर्य ओसण्डत होतें !

या दालनांत भक्तगणांची गर्दी कमी होती. कोणी भक्त फलकावर प्रतिमालेखन करीत होता, तर कोणी गोड आलापाने मूर्तिमन्त रागिणी पुढे उभी करीत होता. कोठे एखादी नर्तकी आपल्या नृत्यकौशल्याने प्रेक्षकांच्या हृदयांत गोड भावलहरी उत्पन्न करीत होती. कोठे एखादा शिल्प-कार आपल्या मनोमूर्तीला प्रत्यक्ष स्वरूप देत होता.

साऱ्या ललितकलांचा तेथे मनोहर सङ्गम झाला होता; पण त्यांतून राजस भाव पाझरत होते. त्यांत ब्रह्मानन्दसहोदर असा कलानन्द विलसत नव्हता. या सर्व कला केवळ परमेश्वराच्या नांवाखाली लक्ष्मीवन्तांना खूष करण्यासाठीं झटत होत्या. इथे कलादेवता लक्ष्मीपुढे हात जोडून उभी होती. कलेच्या स्वैर विलासाला लक्ष्मीने पायबन्द घातला होता. सारा लक्ष्मीचा अधिकार ! लक्ष्मीपुढे सौन्दर्य आपलें प्रदर्शन माण्डून सेवेस तत्पर होतें. अर्थात् इथे अशिक्षित दरिद्र्यांना मज्जाव होता,

हें काय सांगावयास पाहिजे ? तरी पण या ठिकाणची शोभा अतुलनीय अशीच होती. जड निःश्वास सोडून मी देवाकडे नजर टाकली. देवी होती तिथे. देवीची मनोहर मूर्ति सिंहासनावर विराजमान झाली होती. आपल्या भक्तांनी आपली उपेक्षा केल्यामुळे तिचें मुख म्लान झालें होतें, तिच्या विशाल नेत्रांतून उद्वेग, कारुण्य, दुःख, असहाय्यता, इत्यादि भाव ओसण्डत होते.

भारावलेल्या अन्तःकरणाने मी तिसऱ्या दालनांत प्रवेश केला. सारा मण्डप वेदवाणीने विनादित झाला होता. अनेक वेदाभ्यासजड विद्वानांच्या मुखरवाने रङ्ग दुमदुमून गेला होता. ' यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ' अशा ब्रह्माविषयीं निरर्थक शाब्दिक वादविवाद व कोटया करण्यांत सारे गढून गेले होते. नीति, पावित्र्य, शील, धर्म यांचा ज्यांना गन्ध नाही असे बरेच लोक त्यांचें स्पष्टीकरण करण्यांत आपला अमूल्य वेळ व्यतीत करीत होते. गर्भान्धाने लावण्य पारखण्यांतलाच प्रकार हा ! या भक्तगणांत खऱ्या कळकळीचे भक्त फार थोडे असून भोन्दू व ढोंगी यांची संख्याच जास्त होती. लक्ष्मीची इथे बरीच चलती असून तिच्या आधारावर मोक्षाचीं द्वारें खुलीं होत होतीं.

साराच ब्रह्मघोटाळा !

देवीचें अक्राळविक्राळ रूप पाहून मी तर भयभीत झालों. कालीमातेची प्रचण्ड मूर्ति होती ती. तिच्या पायांच्या नखांवर चार नारळ मावत होते. तिच्या प्रचण्ड व कुरूप मुखांतून रक्तप्राशनास हपापलेली ताम्बडी लाल जीभ बाहेर लोम्बत होती. तिचे नेत्र मदिरेसारखे लाल असून क्रूरतेची छटा त्यांत दिसून येत होती. तिने नरमुण्डमाला धारण केल्या होत्या. तिच्या उजव्या हातांत एक तीक्ष्ण शस्त्र व डाव्या हातांत एका स्त्रीचें मस्तक होतें. समोर यज्ञकुण्ड धडाडलें होतें. अनेक असहाय्य स्त्रीपुरुष यज्ञकुण्डांत बलि देण्यासाठी हारीने उभे केले होते. बोकडांच्या हृदयद्रावक केंकाटण्याने अंगावर

शहारे येत होते. सनातनी रूढीच्या जुलुमाने गाञ्जलेल्या अबलांचा टाहो हृदयाचें पाणी पाणी करीत होता. त्या दालनांतील भिंतींचीं व स्थाणूंचीं दगडी अन्तःकरणेंही या दृश्याने सारखीं थरारत होतीं. जास्वन्दीच्या फुलांच्या माला सगळीकडे लटकाविल्या होत्या. मोठमोठ्या समया पेटल्या होत्या. एक प्रकारचा कोन्दट वास भरून राहिल्याने मस्तक फिरल्यासारखें होत होतें! याज्ञिक लोक मुखांतून मन्त्रांचा उच्चार मोठमोठ्याने करीत होते. तेथे असणाऱ्या– वावरणाऱ्या लोकांना हृदय देण्यास देवी विसरली होती. मला तिथे अधिक वेळ थाम्बवेना.

दुःखितान्तःकरणाने खाली मान घालून मी शेवटच्या— चवथ्या दालनांत प्रवेश केला.

दिव्याशिवाय जिकडे तिकडे लक्ख प्रकाश पडला होता. दरिद्री, अनाथ, पंगु, आन्धळे, रोगी स्त्रीपुरुषांनी तें दालन गजबजून गेलें होतें. लक्ष्मी, सरस्वती व कला यांचा वाराही तेथील लोकांना स्पर्शून गेला नव्हता. लज्जारक्षण करण्यासही शरिरावर पुरेसें वस्त्र नसलेल्या स्त्रिया, दारिद्र्याने गाञ्जून गेलेले शेतकरी, दुर्दैवी आन्धळे, पाङ्गळे, मुके, डोळ्यांतून टिपें गाळणारे रोगी, यांनी तें दालन भरून गेलें होतें.

आणि सर्वांना धीर–आश्वासन–देत एक तेजःपुञ्ज विभूति सगळीकडे सावधानतेने फिरत होती.

प्रत्येकाजवळ जाऊन त्याच्या सुखदुक्खाची विचारपूस करून–त्याला दुक्खमुक्त करीत ती विभूति हिण्डत होती. त्या मूर्तीच्या डोळ्यांतील असामान्य तेज व मुखावरचें बालकासारखें निर्व्याज हास्य पाहून प्रत्येकाच्या हृदयाला समाधान प्राप्त होत होतें. दरिद्र्याहून दरिद्री दिसणारी ती व्यक्ति श्रीमन्ताहून श्रीमन्त होती! अत्यन्त अशक्त दिसणाऱ्या त्या मूर्तीला सम्राटाची सत्ताही थरथर कापत होती. स्वतःच्या अङ्गावर टीचभर वस्त्र धारण करणारी ही विभूति साऱ्यांना अन्नवस्त्र पुरवीत होती.

साऱ्यांच्या हृदयांत या एका दिव्य विभूतीचें अधिष्ठान होतें. अज्ञानी व दरिद्री जनतेला दास्यमुक्त करणारा हा परमेश्वर होता. शिम्पल्यांच्या आवरणांतील जणू काय शुक्रासारखा मोतीच ! या परमेश्वराच्या कृपाछत्राखालीं सारी अज्ञानी व दरिद्री जनता सुखाने व आनन्दाने कालक्रमणा करीत होती.

त्या दालनांत जिकडे तिकडे आनन्द, सत्य, पावित्र्य व धैर्य भरून राहिलें होतें.


न कळत माझे हात जोडले गेले. भक्तियुक्त अन्तःकरणाने मीं त्या विभूतीला वन्दन केलें. मजकडे पाहून त्या दिव्य मूर्तीने विमल हास्य केलें आणि मी धन्य झालों.

कलङ्की सुधाकर, क्षारयुक्त रत्नाकर, तसाच हा दरिद्री परमेश्वर !

ज्या देवाधिदेवाच्या दर्शनाकरिता मी इतके आयास केले, त्याचें मला दर्शन झालें !

जीवनाचें सार्थक झालें !

आनन्द ! आनन्द ! आनन्द !



# मरीचिका : : : : : : : २०

शारदी पूर्णिमेची रम्य रात्र !

निळ्या गगनांतून पूर्ण चन्द्र पृथ्वीतलावर सुधेचा वर्षाव करीत होता. चन्द्राचे सेवकगण त्याच्या सभोवार अदबीने उभे होते. चन्द्राच्या अमृतमय किरणांकरिता आसावलेले चकोर चन्द्रकिरणांचें आकण्ठ प्राशन करीत होते.

मन्दाकिनीच्या स्वच्छ पुलिनावर कौमुदीच्या पायघड्या अन्थरल्या होत्या. चन्द्र आपल्या नाजुक शीतल करांनी मन्दाकिनीस प्रेमाने आलिङ्गन देत होता; यामुळे प्रणयिनी मन्दाकिनीच्या हृदयावर उठणाऱ्या लज्जालहरी अतीव मनोहर दिसत होत्या.

सारी पृथ्वी चन्दनरसांत बुडून गेली होती. चन्द्रिकावर्षावाने सारी सृष्टि चैतन्यपूर्ण दिसत होती.

चन्द्राचें हें दृष्ट लागण्यासारखें वैभव मन्दाकिनी आपल्या अगाध हृदयांत साठवून ठेवीत होती.

याच रम्य वेळीं मन्दाकिनीच्या शुभ्र पुलिनावर एक तरुण संन्यासी दररोजच्या सम्प्रदायाप्रमाणे येऊन बसला होता. साऱ्या सृष्टींत विलसणारा आनन्द आणि शान्तता अवलोकन करून त्याला अपूर्व समाधान प्राप्त झालें.

तो वयाने अवघा २३ वर्षांचा असून रूपाने अत्यन्त सुन्दर, ज्ञानी व वैराग्यपूर्ण होता. अवन्तीच्या राज्याचा तो युवराज होता. पण ऐन तारुण्यांतच त्याने संन्यासदीक्षा घेतली होती. युवराजावर प्रजेचें अत्यन्त प्रेम होतें. त्याचा बाप –राजा देवनाग– अत्यन्त क्रूर, दुर्व्यसनी व विषयलम्पट असून प्रजेचा

अमानुषपणें छळ करीत होता. त्याचें आणि युवराजाचें पटेना. युवराजाला राजाने हद्दपार केलें होतें. समाजाची मनोभावें सेवा करण्याकरिताच त्याने संन्यासदीक्षा ग्रहण केली होती. अवन्ती राज्याच्या हद्दीबाहेर मन्दाकिनी नदीच्या तीरावर आश्रम बान्धून तो राहिला होता. अवन्तीच्या प्रजेचा तो प्राण होता. त्याच्यासारखा धर्मशील, पवित्र, दयाळू साऱ्या देशांत कोणी नव्हता.

स्वतःला विसरून तो संन्यासी धवल कौमुदी–सागरांत आनन्दाने विहार करीत होता. सृष्टीच्या अनन्त स्वरूपाशीं तो एकरूप झाला होता. जणू कांही त्याला समाधीच लागली होती. समाधिसुखाचा तो अनुभव घेत असतांना एका हुन्दक्याने तो शुद्धीवर आला. त्याने इकडे तिकडे विस्फारित नेत्रांनी पाहिलें.

बऱ्याच अन्तरावर नदीतीरींच एक स्त्री शोक करीत होती. संन्यासी दचकला, एकदम उठला–त्याने मनाशीं किञ्चित्काल विचार केला आणि शान्तपणें पावलें टाकीत तो त्या स्त्रीजवळ आला. ‘ माई ! आपण कां शोक करतां ? ’ त्याने सहानुभूतीच्या स्वरांत विचारलें.

तिने अश्रुक्लिन्न मुखकमल वर केलें आणि त्या संन्याशाकडे पाहिलें. फाटक्या पदराखालील बाळाने हालचाल केली. तिने त्याला पोटाशी अधिक बिलगून धरलें आणि पुन्हा पडत्या पिसाप्रमाणे खाली मान टाकली. चिन्तेच्या वालुनिकरांत तडफडणारी मासळी होती ती ! वायूच्या स्रोतांत आपलें जीवन टिकविण्याकरिता धडपडणाऱ्या वर्तिकेचा त्याला भास झाला. ‘ माई ! आपण कां बरं शोक करतां ? रात्रीच्या वेळीं नदीतीरावर एकाकी येऊन शोक करण्याइतकं आपणाला कोणतं दुक्ख झालं आहे ?’ संन्याशाने कळवळून विचारलें.

‘काय सांगू आपणाला ? आणि सांगितलं तरी तें आपल्याला खरं

सुद्धा वाटणार नाही !' तिच्या मुखावर करुणा, तिरस्कार, असहाय्यता इत्यादि भावनांचा कल्लोळ उडाला होता.

'माझ्या हातून आपलं दुक्खनिवारण होऊं शकणार नाही का ?' त्याने जिव्हाळ्याने विचारिलें.

पदराआडून बालकाने आपलें मुखकमल बाहेर काढलें ! आकाशांतील चन्द्राकडे पाहून हात वर करून तें आनन्दोद्गार काढूं लागलें. बालकालें निर्व्याज हास्य, निष्पाप खेळ पाहून मातेला किती धन्यता वाटली ! पण दुसऱ्याच क्षणीं पूर्वस्मृतींनी तिच्या मुखावर कारुण्यच्छटा दृग्गोचर झाल्या.

'माझ्या फुटक्या नशिबाबद्दल मला तितकंसं दुक्ख होत नाही; पण माझ्या बाळाचं पुढं कसं होणार ? त्याला उज्ज्वल भविष्यकाल नाही !' हताश होऊन ती बोलली.

'म्हणजे !' तो आश्चर्याने उद्गारला.

'ज्याला आपल्या वडिलांचं नांव आपल्यापुढं लावतां येत नाही, त्याला कसला आला आहे भविष्यकाल ?'

'कां बरं ?'

'तो कुमारिकेचा पुत्र आहे !'

'म्हणून काय झालं ? त्याला आपल्या वडिलांचं नांव लावायला काय हरकत आहे ?'

संन्याशाच्या उत्तराने ती एकदम चमकली ! तिने त्याच्या मुखाकडे तीक्ष्ण नजरेने पाहिलें. त्याची मुद्रा गम्भीर दिसत असून त्याच्या मुखावरील तेजाने तिच्या हृदयांत अधिक आदर उत्पन्न झाला. 'पण त्यानं वडिलांचं नांव लावलं तर तें कोणाला खरं सुद्धा वाटणार नाही !'

‘ कोण त्याचे वडील ? ’

‘ अवन्तीचा राजा देवनाग ! ’ ती तिरस्काराने म्हणाली.

‘ काय राजा देवनाग ? ’ त्याच्या मस्तकावर अशनिपात झाला.

‘ होय, अवन्तीचा राजा देवनाग ! माझं कौमार्य भ्रष्ट करून वर माझ्या बाळाचं सुद्धा जीवित ज्यानं मातीमोल केलं, तोच तो नराधम देवनाग ! ’ ती भ्रमिष्टासारखी हातवारे करून बोलूं लागली.

‘ पण हें कसं घडलं ? ’ त्यांच्या हृदयांत कल्लोळ उडाला होता.

‘ दीड वर्षांपूर्वी देवनाग आमच्या गावीं शिकारीकरिता आले होते. मी माझ्या शेताची राखण करीत असतांना त्यांनी मला पाहिलं. माझं रसरशीत तारुण्य व सौन्दर्य पाहून त्यांच्या मनांत पापवासना उत्पन्न झाली. ते थेट मजकडे आले. प्रत्यक्ष राजाची स्वारी आली. मी किती आदरानं त्यांचं स्वागत केलं! राजा हा प्रजेला पित्यासमान, पण याच राजानें माझा कौमार्य-भङ्ग केला. हा माझा बाळ त्याच्या पापाची गोड साक्ष देत आहे. मी राजा-कडे बाळाला घेऊन गेलें. कौमार्य-भ्रष्ट झाल्यानं मला माता-पित्यानं घरा-बाहेर काढलं. तेव्हापासून मी वणवण हिण्डतें आहें. पतितेला कोण आसरा देणार ? राजानं मला राज्याबाहेर हाकलून देण्याची आपल्या सेवकांना आज्ञा केली-मला राजानं दुराचारी ठरविलं. मला आज या मन्दाकिनीच्या तीरावर आणून सोडून दिलं. स्वामिजी ! माझा बाळ मोठा झाला-त्याला सर्व इतिहास समजला, तर त्याला किती दुक्ख होईल आणि समाजांत त्याला कोण विचारणार ? भविष्यकालीं समाजानं बहिष्कृत केल्यानं त्याला हीनावस्थेंत जीवन कण्ठावं लागेल. त्यापेक्षा आताच जलसमाधि घेतलेली बरी नाही का ? ’

संन्याशाच्या तेजस्वी मुखावर गाम्भीर्य पसरलें.

‘ एका निरपराधी अबलेला व निष्पाप बालकाला आपल्या पित्याच्या दुष्टपणामुळं जीविताला मुकावं लागणार !-काय हा दैवाचा खेळ ! आपल्या


डोळ्यासमोर दोन जीव जलसमाधि घेणार! ' विचारातिरेकाने त्याचें मस्तक सुन्न झालें. काय करावें हें त्याला सुचेना! त्याच्या हृदयसागरांत विचारांचा वडवाग्नि पेटला.

' स्वामिजी ! सांगा, माझ्या बाळानं कुणाच्या मुखाकडे पिता म्हणून पहावं ? त्यानं कुणाकडे पिता म्हणून बोट दाखवावं ? ' तिने सद्गदित होऊन विचारलें.

' माझ्याकडे ! ' स्वस्थपणें संन्यासी उद्गारला.

' काय ? ' ती चमकून म्हणाली.

' हो मी बाळाचा पिता होतों ! ' त्याने प्रेमाने बालकाला उचलून छातीशीं धरलें. संन्यासी-हृदयांतून प्रेमसरिता वाहूं लागली. तिचें हृदय भरून आलें. कृतज्ञतापूर्वक तिने त्याच्या पायांवर मस्तक टेकविलें.



सन्ध्याकाळची चारची वेळ !

विस्कटलेल्या अलकभाराचा अम्बाडा बान्धीत ती खिडकींत उभी होती. तिच्या भालप्रदेशावरील कुंकुमतिलक अर्धवट पुसला गेला होता. तिच्या मृगलोचनांत अजून दोनप्रहरची मुग्ध निद्रा तरङ्गत होती. अङ्गावरील चोळामाळा झालेलें वस्त्र साफ करतां करतां एक गोड जाम्भई देऊन तिने भुवया वक्र केल्या. पदर सावरून ती रस्त्यावर धुळींत खेळणाऱ्या बालकांकडे आसावलेल्या नजरेने पहात होती.

अलीकडे ती थोडी आळसट बनत चालली होती. तिची अङ्गकान्तीही अधिकाधिक तेजस्वी होत होती. आज ती गोड गुङ्गींत होती.

तोंच पाठीमागून अनपेक्षितपणें—

‘ नीच ! खिडकींत उभी राहते ! ’ तिच्या नाजुक कमरेंत लाथ हाणीत तिचा पतिदेव गरजला ! आज दारूच्या धुन्दींत होता तो.

‘ मी मरण्याचीच वाट पाहत आहेस तूं ! त्याखेरीज धन्दा कसा करतां येणार ? ’ एवढें बोलून त्याने किती विकट हास्य केलें. भूमीवर निःशक्त होऊन पडलेल्या त्याच्या तरुण स्त्रीचें हृदय छिन्नविच्छिन्न झालें—

काचेचें भाण्डें खळकन् फुटलें.

इतके दिवस तिच्या हृदयांत असलेल्या पतिविषयक धर्माचें बन्धन ताडकन् तुटलें. ती झटकन् उठून बसली. तिच्या करारी मुद्रेकडे पाहून तो बावरला. व्यभिचारी माणूस संशयी नि अत्यन्त भित्रा असतो. त्याची नशा चाङ्गलीच उतरली; खाली मान घालून तो आल्या पावलीं परतला.

आपण इतक्या पतिव्रताधर्माने वागत असूनही पतीला त्याबद्दल संशय

यावा, याचा तिला मनस्वी सन्ताप आला होता. स्त्रियांना भावना, वासना, मानापमान असतात, याची त्याला जाणीवही नव्हती. रोज गुरासारखें काम करूनही त्याच्याकडून तिला एकही सुखाचा शब्द कधी मिळाला नाही. सारा पैसा त्याने वेश्येच्या पायीं खर्च करून टाकला. नुक्तेंच त्याला दारूचें व्यसन लागलें होतें. ती बिचारी चार घरचीं कामें उपसून त्याच्या पोटाला घालीत असे. कारण तो तिचा एकमेव ईश्वर पडला ना ? तिच्याकडून पैसा काढण्यास तो तिला मारण्यासमुद्धा कमी करीत नसे. तिच्या सहनशीलतेची सीमा झाली. पतिव्रताधर्माच्या महतीवर स्वैर लेखणी चालविणारा एकही धर्ममार्तण्ड तिच्या सहाय्याला धावून जात नव्हता! अशा दुर्व्यसनी, दुष्ट, वेश्यागमनी पतीविषयी तिच्या ठिकाणीं कसा आदर रहावा ? इतके दिवस अबोला व दण्ड यांवर भागत असे; पण आज बोलूं नये तें तो बोलला.

साण्डलेला पारा परत भरतां येईल ? बोललेले शब्द परत घेतां येतील ?

जिवाचा कण्टाळा आला तिला. जगून तरी काय करणार ती ? ज्याच्या जिवावर जगायचं, तोच जर उलटला तर काय करणार बिचारी ?

अत्यन्त दृढ निश्चयाने दुक्खाबरोबर आपलाही शेवट करून घ्यावा, म्हणून ती रात्रीच्या वेळीं नदीच्या काठीं आली. हात जोडून भक्तिभावाने परमेश्वराची करुणा भाकली आणि जीव देण्याकरिता पात्रांत उडी घेण्यास ती सज्ज झाली. क्षणमात्र तिच्या मस्तकांत एक विचार चमकून गेला. वेड्यासारखी मन्त्रमुग्ध होऊन त्याच ठिकाणीं ती मट्कन् खाली बसली.

तिच्या मस्तकांत काहूर माजलें ! सभोवतालच्या अन्धकाराइतकेंच तिचें मस्तक सुन्न झालें. काय करावें हेंच तिला सुचेना. आकाशांतील तारका डोळे मिचकावून तिला खुणवीत होत्या. सरितेच्या चञ्चल लहरी किनाऱ्याशीं हुतुतू खेळत होत्या पण ती मुळी भानावरच नव्हती.

समोर अन्तराळांत तुटणाऱ्या उल्केच्या प्रकाशाने ती शुद्धीवर आली.

'माझ्या पोटच्या गोळ्याकारिता कसंही करून मला जगलंच पाहिजे,' आकाशाकडे पाहून ती आपणाशीच पुटपुटली.

# मरीचिका : : : : : : : २२



गच्चीवर कठड्याला टेकून उभी होती ती !

तिची दृष्टि एका नक्षत्रपुञ्जावर खिळली होती. पण तिचें मस्तक अन्तःकरणाप्रमाणेच भारावलें होतें.

कांही सुचत नव्हतें, कांही रुचत नव्हतें.

अतृप्त हृदयाचे उदास भाव तिच्या सुन्दर व नाजुक मुखकमला-वर तरङ्गत होते. भरल्या अन्तकरणाचा भार तिला असह्य झाला आणि तिने एक जड निःश्वास सोडला.

तिची शून्य दृष्टि आकाशांत पक्ष्याप्रमाणे विहार करूं लागली !

कुठूनशी एक गोड लकेर तिच्या कानावर आली. किती मञ्जुळ व हृदय-वेधक स्वर ते !

ती बावरून गेली. तिचें वक्षस्थळ कम्पित होऊं लागलें. ती कावरीबावरी होऊन इकडे-तिकडे सभय हरिणीसारखी पाहूं लागली; पण तिच्या बावरल्या नयनांत समाधानाची ईषत् छटा विलसत होती. ती लक्ष देऊन कानांत प्राण ठेवून ऐकूं लागली—

आवो आवो हृदय बीनकी
वो मेरी मृदु पञ्चम तान
शून्य दिशाओंमें, समीरमें

भर दो फिरसे नूतन गान
आवो मेरे मानससरकी
चपल मृदुल लघु शुचि हिलकोर
तेरे ही सङ्ग विकल विश्व में
हो जाऊं आनन्द-विभोर

आर्त जीवाने हृदय पिळवटून गायिलेलें भावगीत होतें तें !

तिच्याकरिता सर्वस्वाचा होम करणाऱ्या तिच्या प्रियकराच्या हृदयगीताने तिच्या अन्तःकरणांत गोड संवेदना उद्भूत झाल्या. दुःख, आनन्द, प्रेम इत्यादि भिन्न भावनांनी तिचें हृदय भरून गेलें. कठड्याला मस्तक टेकून ती विकल होऊन पडली.

किती तरी वेळ ती तशीच पडून होती !

आकाशमध्यांतून चन्द्र आपलीं धवल सुधाकिरणें तिजवर फेकीत होता. सारी सृष्टि रजत-रसांत बुडून गेली होती.

तिला किञ्चित् जाग आली.

एक जटाधारी व शुभ्र दाढी असलेला भव्य संन्यासी तिच्यापुढे उभा होता. तिने भक्तिभावाने त्याला वन्दन केलें आणि विचारलें, " महाराज ! माझे मनोरथ केव्हा सिद्धीस जाणार ? "

तिच्या नेत्रांत आसवांनी गर्दी केली.

" काय म्हणून तुझे मनोरथ सिद्धीस जावेत ? " मेघगर्जनेप्रमाणे गम्भीर आवाज काढून तो बोलला. " तूं स्वतः काय स्वार्थत्याग केला आहेस ?"

या शब्दशरांनी तिचें अन्तःकरण विद्ध झालें. डोळे मिटून ती स्वतःशींच विचार करूं लागली. " खरंच, मी काय बरं स्वार्थत्याग केला आहे ? कांही नाही. केवळ इच्छामात्रें करून का इष्ट वस्तु लाभणार ? लक्ष्मी हात जोडून उभी असली, म्हणून मला मुग्ध करणारें हृदय मिळणें शक्य आहे का ?

त्याकरिता अविश्रान्त यत्न करावयास नकोत का? प्रेमप्राप्तीकरिता मी कोणता दिव्य त्याग केला आहे बरं?"

तिच्या हृदयांतून अस्पष्ट साद उठूं लागला.

वादळी सागरांत सापडलेल्या नौकेप्रमाणे तिचें हृदय हेलकावे खाऊं लागलें. तिच्या मस्तकांत हे विचार चालू असतांनाच तो दिव्य संन्यासी गुप्त झाला. पहाटवाऱ्याची झुळुक त्रस्त जिवाला शान्त करते, त्याप्रमाणे संन्याशाच्या शब्दांनी तिच्या पेटलेल्या हृदयाला शान्तता लाभली.

प्रेमपुष्प फुलावयास त्याला त्यागाचें जीवन घालावें लागतें, हें तिला पटलें.



चौपाटीच्या वाळूवर खिन्न मनाने बसली होती ती !

सागर विषारी नागाप्रमाणे लाटांचे फूत्कार टाकीत होता. किती तरी वेळ ती विचार करीत होती ! दिनमणीने रत्नाकराच्या विशाल उदरांत दडी दिली तरी ती भानावर नव्हती. आयुष्याच्या भेसूर भवितव्याने खचून गेली होती ती !

हास्याच्या मञ्जुळ ध्वनीने ती एकदम शुद्धीवर आली, अन् बावरलेल्या नजरेने इकडे तिकडे पाहूं लागली. तिच्या बाजूस जवळच एक विशीच्या आंतली लावण्यवती तरुणी आपल्या तीन वर्षांच्या मुलाबरोबर वाळूचे किल्ले बान्धीत होती. किती निर्व्याज क्रीडाविनोद चालला होता ! त्या तरुण मातेचें वत्सल हृदय आनन्दसागरांत डुम्बत होतें.

तिच्या नेत्रांत तारकांची चमक होती, मधुर स्मितांत चन्द्रलेखेची चारुता होती आणि नाजुक ओठांतून पारिजातकाचा अस्फुट गन्ध दरवळत होता. तिच्या वेषभूषेने तिच्या सौन्दर्याची शोभा अधिकच कमनीय दिसत होती

रवीने आपलें किरणजाळ आवरून घेतलें होतें. आता नलिनभःसागरांत चन्द्रिका-लहरीवर बसून इन्दुकला विहार करीत होती. प्रशान्त सागराच्या विशाल हृदयावर वीचिमाला आपल्या ललित लास्याने इन्दुकलेचें मनोविनोदन करूं लागल्या. मन्दानिलाची थण्डगार झुळुक शरिरांत सुखसंवेदना उत्पन्न करीत होती. आकाशांतील सुवर्णमय रक्तिमा लोपून चन्द्रिकेमुळे सारी सृष्टि चन्दनरसांत न्हाऊन निघाल्यासारखी दिसत होती. इन्दुकलेची अनुपम सुषमा नेत्रांना आल्हाद देत होती. जिकडे तिकडे सौन्दर्य ओसण्डून राहिलें होतें. खेळतां खेळतां मधेच त्या बालकाने प्रेमभराने तिच्या-मातेच्या-

कण्ठांत आपले चिमुकले हात घालून तिचें चुम्बन घेतलें. बाळाला कुठे ठेवूं नि कुठे नको, असें त्या तरुण मातेला झालें. त्याच्या निर्व्याज मधुर हास्याने वातावरणांत प्रसन्नता उधळली गेली !

मायलेकराची हास्यक्रीडा डोळे भरून ती पहात होती. गतकालच्या स्मृतींनी तिच्या नेत्रांतून अश्रुमौक्तिकांचे सर ओघळूं लागले. ' आपला बाळ आज जिवन्त असता तर आपणही असाच क्रीडा-विनोद केला असता!' किती तरी वेळ ती अभागी तरुणी मूक शोक करीत होती.

दुर्दैवी बिचारी !!

ती सुन्दर तरुणी आपल्या बालकाला घेऊन उठली आणि घरच्या ओढीने परतूं लागली. त्यांना जातांना पाहून ती अभागी तरुणी भानावर आली. फाटक्या पदराखालच्या तान्ह्या मुलीने हालचाल केली आणि तिला आपल्या दैन्याची जाणीव झाली. भुकेने रडून रडून सुकलेल्या तान्हुल्याच्या मुख-कमळाकडे पाहून तिला भडभडून आलें. भुकेने स्वाभिमानावर जय मिळविला. ती जवळ जवळ धावतच त्या तरुणीपुढे आली. लाचार होऊन दीन-वाणीने ती प्रार्थूं लागली-- ' माई ! माझ्या पोटांत कांऽही नाही, पोर भुकेनं तडफडतं आहे. कांही तरी पोटाला द्या. देव तुमचं कल्याण करील. '

त्या तरुणीने विस्फारित नेत्रांनी तिच्याकडे पाहिलें. तेजोहीन अस्तङ्गत चन्द्रम्याचा तिला भास झाला. दारिद्र्याने अवकळा प्राप्त झालेल्या अस्थिपञ्जर देहांतूनही तिचें गतसौन्दर्य भासमान होत होतें. ती शुष्क लतेसारखी दिसत होती ! दुक्ख, औदासिन्य, कारुण्य, असहायता यांचे संमिश्र भाव तिच्या मुखावर तरङ्गत होते. मूर्तिमन्त दारिद्र्यां-तूनही तिचा मानी कुलीनपणा उठून दिसत होता.

त्या तरुणीने किंचित्काल तिच्याकडे निरखून पाहिलें आणि सहानु-भूतीने आपल्या ब्लाऊजच्या खिशांतून एक रुपाया काढून तिच्या हातांत दिला नि विचारलें– ‘ बाई ! तुम्ही कुलीन दिसतां, मग तुम्हाला अशी स्थिति कशानं प्राप्त झाली ? ’


‘ सम्पामुळं ! ’ रुद्ध कण्ठाने ती बोलली; पण त्याच वेळीं तिच्या कपाळावर आठ्या चढल्या.

‘ म्हणजे ! ’ ती तरुणी आश्चर्याने उद्गारली.

“ सम्पांत सामील झाल्यानं घरधन्याची नोकरी सुटली. पुढारी-पण मिळालं, पण अन्न मात्र कायमच गमावलं. तेव्हापासून एक वर्ष आम्हाला नोकरीवाचून काढावं लागलं ! आमची उपासमार होऊं लागली. उपासमारीनं माझ्या थोरल्या मुलाचे हालहाल झाले. शेवटीं देवाच्या अन्यायी कृत्याचा जाब घेण्याकरिता तो देवाच्या घरीं गेला. घरधनी पुन्हा सम्पांत पडल्यानं त्यांना चार वर्षांची शिक्षा झाली आणि मी अशी अभागी दिवस कण्ठीत आहें ! ”

दुःखावेग सहन न झाल्याने तिला भोवळ आली व ती मटकन् खाली बसली !

मलबारहिलवरील धनिकांचे वाडे बिजलीच्या तेजाने चमकत होते !



ठाणे

'कि ती छान आहे नाही माझा बाळ ! ' आपल्या दोन वर्षांच्या मुलाकडे पाहून ती सुन्दर तरुणी उद्गारली.

साऱ्यांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें !

याहून दारुण दैवदुर्विपाक तो कोणता ?

राक्षसी, उलट्या काळजाची, म्हणून सर्व लोक तिला सम्बोधीत होते आणि त्यांनी तरी एका परीने तसें कां म्हणू नये ?

प्रत्यक्ष पोटचा गोळा आणि त्याला तिने पाण्यांत बुडवून ठार मारलें.

मुलगा तर किती गोण्डस, सुन्दर, खेळकर नि गोरा गोरापान होता! कुणीही पाहिलं, की म्हणावं ' दृष्ट लागेल बाळाला ! ' अशा एकुलत्या एक मुलाचा तिने अमानुषपणें खून केला !

रीतसर कोर्टांत तिच्यावर खटला सुरू झाला. लोकांची तुफान गर्दी मोडण्यासाठी स्वतंत्र पोलिसांची योजना झाली.

तिने निर्भयपणें केलेल्या गुन्ह्याची कबुली दिली.

क्रोधाने फेसाळलेला जनसागर एखाद्या हिंस्र पशूमारखा गुरगुरत होता. 'प्रत्यक्ष पोटच्या मुलाचा खून करणाऱ्या या तरुणीला फासावर चढवा!' असा क्रोधयुक्त ध्वनि सर्व बाजूंनी उठूं लागला. खवळलेल्या जनसमुदायाला आवरून धरणें पोलिसांना अशक्य झालें.

लोकांच्या तीव्र विरोधाने ती अधिकच धीट बनली. कसल्याच भावच्छटा तिच्या सुन्दर मुखकमलावर विलसत नव्हत्या. अगदी निर्विकार मुद्रेने ती न्यायाधिशाकडे अवलोकन करीत होती.

न्यायाधिशाने तिला खुनाचें कारण विचारलें.

' करायचं काय कारण सांगून ? गुन्हा कबूल करतें. द्याल ती शिक्षा

भोगायला मी आनन्दाने कबूल आहें. ' ती बेदरकारपणें उत्तरली.

न्यायाधिशाने किञ्चित् स्मित केलें आणि पुन्हा तिला आग्रहपूर्वक विचारलें.

ती बोलूं लागली, " माझ्या बाळाची होणारी उपासमार मला पाहवेना. भुकेने व्याकुळलेल्या व निश्शक्तपणें हातपाय झाडणाऱ्या बाळाकडे पाहून माझं हृदय तिळतिळ तुटूं लागलं आणि म्हणून या अनन्त यातनांतून मी त्याला कठोर अन्तःकरणानं मुक्त केलं. " बोलतां बोलतां दुक्खाने तिचा ऊर भरून आला.

आणि तिने मान खाली घातली.

सारा जनसम्मर्द खवळून गेला. क्रोधाचे फूत्कार सभोवती उठूं लागले.

तिने सर्वांवर एक तिरस्कारयुक्त कटाक्ष फेकला !

न्यायाधिशाचें अन्तःकरण भरून आलें.

त्याने निकालाची तारीख पुढे टाकली.

× × ×

आपल्या मुलाला तिने एकदा शेवटचें पाहून घ्यावें म्हणून त्याच दिवशीं सन्ध्याकाळीं तिला तुरुङ्गांतून हॉस्पिटलमध्ये मुद्दाम आणण्यांत आलें. थरथरत्या पाउलांनी व धडधडत्या अन्तःकरणाने तिने खोलींत प्रवेश केला. तिचा बाळ पाळण्यांत कायमचा झोपी गेला होता ! तिला त्याच्याजवळ नेण्यांत आलें.

किती तरी वेळ आपल्या बाळाकडे टक लावून पहात होती ती ! तिची मुद्रा निर्विकार दिसत होती; पण तिच्या नेत्रांत तीव्र दुक्खाचें तुफान उसळलें होतें.

अगदी हळूच बाळाचा हात तिने आपल्या हातांत घेतला. बाळाची जणू काय झोपमोड होऊं नये, इतकें अलगद बाळाला उचलून तिने छातीशीं धरलें. स्नेहभराने थरथरणाऱ्या ओठांनी बाळाचें गोड चुम्बन घेतलें

आणि त्याला दाईच्या स्वाधीन केलें.

"किती छान आहे नाही माझा बाळ ?" बालकाकडे शेवटचा दृष्टि-क्षेप करीत असतां ती अर्धवट आपल्याला व अर्धवट दाईला उद्देशून उद्गारली.

इतका वेळ महत्प्रयासाने थोपवून धरलेली दुक्खसरिता आतामात्र अनन्त मार्गांनी वेगाने वाहूं लागली. तिचा कण्ठ सद्गदित झाला. नेत्र बाष्पाकुल झाले. तिच्या भङ्गलेल्या हृदयाचे तुकडे तुकडे झाले !

तोंच तिला जलदीने परत तुरुङ्गांत नेण्यांत आलें.



कुर्डुवाडी स्टेशनवर ती गाडींत चढली !

आपले टपोरे नेत्र तिने सगळीकडे फिरविले आणि कुठे मोकळी जागा नाहीशी पाहून ती बाकांच्या मध्येच बसली. तिच्या कडेवर दोन वर्षांची एक मुलगी होती. किती सुकलेली पोर ! केसाच्या बटा लोम्बत होत्या. फाटकें कुडतें तिचें अङ्ग झाकण्याचा फोल प्रयत्न करीत होतें.

आईकडे केविलवाणी टक लावून पोर कळवळली, 'आई ! भूक लागली.'

तिच्या लोचनांत आषाढमेघांनी गर्दी केली. तिने तिला स्तनाला लावून फाटक्या पदराखाली झाकलें, आपलें तारुण्य झाकण्यास जिच्याजवळ वस्त्र नाही, ती त्या दोन वर्षांच्या मुलीला कशी झाकूं शकणार? दोन दिवस उपाशी असल्याने तिच्या स्तनांत दूध नव्हतें. पोर अधिकच व्याकुळली आणि स्तन सोडून रडूं लागली.

तिच्या असहाय्य परिस्थितीशीं कोण सहसंवेदन पावणार ? जो तो तिच्या सौन्दर्याकडे –अवयवांकडे– गिधाडाच्या दृष्टीने पहात होता.

इतक्यांत सर्वांचें लक्ष एका सुरेल तानेने वेधून घेतलें ! एक तीस वर्षांचा कफनीवाला एकतारीवर गोड भजन करूं लागला होता. त्याच्या गोड लकेरीने सर्वांच्या हृदयांत आनन्द सळसळला. डाव्या हातांत चिपळ्या व उजव्या हातांत एकतारी घेऊन किती गोड भजन करीत होता तो !

सर्वांनीच आग्रह करून त्याला आणखीन् एक अभङ्ग म्हणावयास भाग पाडलें. त्याच्या पेटींत ५–६ आण्यांचा खुर्दा वाढला.तो एका अनाथाश्रमाचा फिरता पगारी सेवक होता.

भिकारीच !

पण भीक मागण्याची कला त्याला अवगत होती ! भीक मागण्याच्या


कलातन्त्राचा त्याने अभ्यास केला होता. त्यामुळे त्याच्या कलेला चाङ्गलेंच मोल प्राप्त झालें होतें. पांचसहा मिनिटांत ५–६ आणे मिळवून मोकळा झाला तो. किर्लोस्करवाडीवर गाडी थाम्बतांच त्याने डबा बदलला.

भुकेने व्याकूळ झालेली पोर अधिकच मोठ्याने आक्रोशूं लागली. जवळच बाकावर बसलेल्या पगडीधर सभ्यांच्या कपाळावर आठ्या चढल्या. 'पुरुषार्थी'च्या आडून 'समाजस्वास्थ्या'चा ते रसास्वाद घेत होते. त्यांच्या आनन्दांत व्यत्यय आल्याने ते सन्तापून ओरडले, 'ए बाई ! पोरीचं तोण्ड बन्द कर ना ? हे भिकारी थोडीसुद्धा स्वस्थता लाभूं देत नाहीत.' अर्थात् दुसरें वाक्य ते अर्धवट स्वतःशींच उद्गारले.

'आजोबा ! पोरीच्या पोटांत सकाळपासून अन्नाचा कणही नाही म्हणून रडते आहे. मी तरी काय करूं ?' लाचार होऊन तिने खाली मान टाकली.

'अन्नाचा कण नाही ? भिकारी ते भिकारी मग असले धंदे करायला बरं सुचलं ?' त्या मुलीकडे बोट दाखवून निर्लज्जपणें ते पगडीधर बोलले. आजोबा म्हटल्याबद्दलचा सूड घेतल्याचा सैतानी आनन्द त्यांच्या मुखावर दिसत होता. आसपासचे लोक फिदीफिदी हसूं लागले !

शरविद्ध पक्ष्याप्रमाणे तिची स्थिति झाली !



माझा जीव किती उत्कण्ठेनं साद घालतो; पण त्याचा पडसाद कुठं उमटतो आहे ! आणि म्हणूनच तो पिञ्ज्यांतील पाखराप्रमाणं झुरत आहे.

माझ्या अन्तरांत पेटलेली आग कशी शमणार !

सहानुभूतीच्या आसवांनी ती अधिकच पेट घेते. कारण, सारे जण कोरडी सहानुभूति दाखवितात. त्यांच्या ठिकाणीं अन्तरींची तळमळ–सहसम्वेदना–कुठून असणार !

दिवसा जगाच्या कोलाहलांत साद घालून पाहिला, पण तो कुणालाच ऐकूं गेला नाही; म्हणून भयाण रात्रीं निबिड अरण्यांत गेलों; साद घातला; पण तो कण्ठाबाहेरच पडला नाही. कुणी तरी माझा गळा गच्च दाबून धरला आहे असा मला भास झाला. दम कोण्डून जीव गुदमरल्यासारखें झालें.

माझें दुक्ख जगाला दिसत नाही, कां जग माझ्याकडे दुर्लक्ष करतें ?

जगाचं लक्ष माझ्याकडे वेधून घेण्याचं सामर्थ्य माझ्या ठिकाणीं नाही. या कात्रींत सापडल्यानं माझ्या हृदयाचे मात्र तुकडे तुकडे होऊं लागले आहेत.

बाह्य गोष्टींवरून पारख करण्याची जगाची रीत. माझ्या हृदयाची पारख कुणालाच होत नाही. माझ्या हृदयाची हाक कुणाच्याच कानीं जात नाही. जगाच्या अन्तापर्यंत मी असाच दुर्लक्षिला जाणार का ?

माझं अन्तःकरण चेतविणारा, माझ्या अन्तःसंवेदनेशीं एकरूप होणारा, माझ्या सुखदुक्खाचा वाटा घेणारा सोबती मला नाहीच का मिळणार ? माझ्या हृदयांत पेटलेली आग नाहीच का शमणार ?

माझ्या म्लान भावना फुङ्कर घालून कुणी नाही का उमलविणार ?

जीवनमार्गाचा प्रवासी मी.

खान्द्यावर ओझें टाकून मी माझा मार्ग आक्रमीत होतों.

मी कुठे जाणार, याची माझी मलाच कल्पना नव्हती. समोर दूरवर क्षितिजावर चमकणारी एक तारका माझें चित्त मधून मधून वेधून घेत होती. ओसाड माळरानांतून, वैराण वाळवण्टांतून, घनदाट अरण्यांतून मी मार्ग तुडवीत चाललों होतों. मार्ग आक्रमीत असतां क्रूर श्वापदांचें मला भय वाटलें नाही, जलचरांना मी डरलों नाहीं, उत्पातानेंही मी गलित-धैर्य झालों नाहीं. मार्ग अविश्रान्त कापीत चाललों होतों मी !

तूं शिबिकेंतून निघाली होतीस. माझी गति मन्द असल्याने मागून निघूनही तूं मला गाठलेंस.

दोघांचाही प्रवास एकाच मार्गाने असल्यामुळे वाटेंत तुझीमाझी ओळख झाली. ती मी विसरणें शक्य नाही.



अनन्त नीलाकाशांतील विरल अभ्रपटलांप्रमाणे तुझ्या नील-लोचनांत,अन्तःकरणांत उसळणारे भाव तरङ्गले. मजविषयी तुझ्या नाजूक हृदयांत नवस्नेहभाव उदित झाले. हृदयांतील भावना लपविण्याचा तूं फोल प्रयत्न केलास. यौवन जसें लपवितां येत नाही, तद्वत् भावनाही लपवितां येत नाहीत. तुजभोवती उभारलेलीं कृत्रिम बन्धनें पाळण्याची तुजवर समाजाने जबरदस्ती केल्याने

तुझें हृदय तुला उघडें करून दाखविण्याची चोरी झाली. भावनांचा कोण्डमारा असह्य झाला. हृदयपरिसरांत गुदमरलेल्या भावना नेत्रद्वारें बाहेर पडण्यास धडपडूं लागल्या. तुझ्या मृगलोचनांत प्रकट होणाऱ्या सान्द्रभावांनी माझें हृदय व्याकळून गेलें. तूं भयभीत हरिणीसारखी कावरीबावरी होऊन मजकडे पाहूं लागस, तेव्हा माझें हृदय कळवळत असे.

तूं हसलीस–पण त्यांत कारुण्यच व्यक्त झालें !

तूं बोललीस–पण मूळ विषयाची टाळाटाळ केल्याने तुझें भाषण तुला दगा देण्यास कारण झालें.

तूं गेलीस आणि माझ्या आकांक्षेचे मोहोर जळून गेले.

तुझें स्मरण होतांच मी व्याकळून जातों. मला एकाकी हा प्रवास सम्पवावा लागणार ना ?

तुझामाझा वियोग होतांना मी तुझा नाजुक हात माझ्या हातांत घेतला; तुझ्या लोचनांत अश्रु दाटले,


' आता पुन्हा भेट ? ' तूं गद्गदित कण्ठाने विचारलेंस.

' अनन्तांत ' असें म्हणून मी तुझ्या हाताचें चुम्बन घेतलें. तूं खाली मान घातलीस.

तुझामाझा वियोग झाला !

पण !– पण ! अनन्तांत तरी तुझीमाझी भेट होईल का ?

वेडी आशा !



तुम्ही येणार हें मला माहीत नव्हतं ! मला कळवूनही आपण आला नाहीत ! मी पूर्ण बेसावध होतें.

आपण येणार अशी माझ्या कानावर थोडी जरी गुणगुण आली असती, तरी आपल्या स्वागताची मी किती तयारी केली असती म्हणून साङ्गू !

आपल्याकरिता मी माझा महाल शृङ्गारला असता. सुगन्धी पुष्पांच्या माळा सभोवार लटकविल्या असत्या. जिकडे तिकडे मोत्यांचीं तोरणें बान्धलीं असतीं. आपल्याकरिता माझ्या पञ्चप्राणांच्या पायघड्या मी तयार केल्या असत्या. कित्ती कित्ती केलं असतं म्हणून साङ्गू !

पण...तुम्ही न कळवितां आलांत आणि माझा घात केलात. तुमचं स्वागत करावं कसं—बोलावं कसं—वागावं कसं—रागवावं कसं—हो, तें सुद्धा मी ठरविलं असतं आणि मग तुम्ही आलां असतां तर ?

पण माझे सारे मनोरथ आपण ढासळून पाडलेत.

तुम्ही एकाएकी आलांत आणि मी बावरून गेलें.

आपलें स्वागत करून आपणाला बसायला आसन द्यायचं सुद्धा मी विसरलें. किती वेन्धळी नि अजागळ मी !

पण मी तरी काय करूं ? माझं हृदय बावरून गेलं ! मला कांही सुचे-नासं झालं. सभोवतालचीं माणसं मजकडे पाहून काय म्हणतील याची मला लाज वाटली आणि माझी फारच तारांबळ उडाली.मी अगदी गोन्धळून गेलें.

तुम्ही घेतलंत हसून पण मी गेलें फसून !

पण तुमच्या हसण्यानं मला किती धीर आला म्हणून साङ्गू !

पुन्हा असंच नकळत येणं होईल का ?

# मरीचिका : : : :

तूं मला पाहिजेस !



तुझ्याकरिता मी वैभवावर लाथ मारली, गणगोत विसरलें. तुझ्यासाठीच केवळ सर्वांचा त्याग करून तुझ्या पायाजवळ वनांत आलें.

मग आता तूं मुग्ध कां ?

मीलनासाठी मी आतुर नि तूं तर असा चिन्तातुर !

वस्तुमात्रांच्या मीलनांतच विश्वाचा आदि हेतु सिद्धीस जातो, हें विसरतोस तूं !

शीतल शशीची आल्हादप्रद चन्द्रिका उसळत्या सागराच्या विशाल हृदयावर विश्रान्तिसुखाचा अनुभव घेते.

सागर अनन्त लाटांनी धरेला बाहुपाशांत बद्ध करूं पाहतो.

वृक्षाला प्रेमाने विळखा घालून लता त्याच्याशीं गुजगोष्टी करते.

भ्रमराला कमलकोशांतून मुक्त होतां येत नाही.

अशरीरिणी कीर्तिसुद्धा मानवाच्या मागे अभावितपणें लागते.

पृथ्वीपासून दूर दूर निघालेले मेघ उत्कण्ठेने सहस्रावधि धारांच्या द्वारें पृथ्वीचें चुम्बन घेतात.

चपल सौदामिनी मेघाला करपाशांत आवळून नृत्य करते.

क्षितिजाकडे ओझरती नजर टाकली, तरी व्योम-धरेचें अपूर्व मीलन दृष्टीस पडतें !

चराचरांतील प्रत्येक वस्तुमात्र मीलनाची इच्छा करतें आणि मीलना-

नन्तर त्याला आत्यन्तिक सुखाची प्राप्ति होते.

पण आज तूं मुग्ध कां ?

मला तूं पाहिजेस ! तुझ्याकरिता माझा जीव पाखरूं होतो.

तुला मी शरीर व पञ्चप्राण वाहिले आहेत. तूं मला मिळालास की, मला विश्वाचें वैभव मिळाल्यासारखें आहे. तुझ्या सान्निध्यांत सारें जग मला तुच्छ आहे.

मी एकच शब्द बोलावा म्हणून तूं माझी किती मनधरणी करीत होतास! माझ्या एकाच प्रेमकटाक्षाकरिता तुझे नेत्र किती आसावलेले असत! आपल्या हृदयमन्दिरांत माझ्या मूर्तीची स्थापना करून माझ्या सुखाकरिता वाटेल तें साहस करण्यास तूं प्रवृत्त झालास; मग आता तूं मुग्ध कां ?


मजवर नित्य अमृतवर्षाव करणारी तुझी प्रेमळ दृष्टि आज शून्य कां ? तुझ्या हसऱ्या मुखावर आज अशी खिन्नता कां ?

मला पाहतांच किती आनंदाने तूं स्मित करीत होतास. पण आज मी तुझ्या पायांशीं आलें असतांना तूं असा उदास कां ? माझ्या अन्तःकरणाला यामुळे किती यातना होत आहेत, याची तुला कल्पना तरी आहे का ?

मला तुझ्याशिवाय कोण आहे ? तूंच जर मला दूर लोटलेंस, तर मी कुणाच्या मुखाकडे पाहूं ?

माझा कण्ठ सुकला, नेत्रांतील अश्रु आटले!

आता मला किती छळून घेणार ?



सारे लोक तुझ्यावर दृष्टि लावून होते ! सर्व सभा तुझ्या गुणांचें कौतुक करण्यांत गुङ्ग झाली होती. तुझी सुगुणशाली आणि सुन्दर मूर्ति पाहून माझें हृदय आनन्दाने भरून ओसण्डत होतें. तुझ्या गुणप्रभेने दिपून गेलों होतों मी !

पण तुझे नेत्र अस्थिर दिसत होते ! अधीरान्तःकरणाने तूं कुणाला तरी शोधीत होतीस !

तूं बावरल्यासारखी इकडे तिकडे अधून मधून पहात होतीस! तुझ्या चाल-लेल्या स्तुतीला कण्टाळल्यासारखी दिसलीस मला तूं. तुझी शोधक नजर बऱ्याच वेळाने स्थिरावली, पण कुठे ?—मजवर ! आणि माझ्यांत विद्युत्-सञ्चार झाला. मी माझ्या लाजऱ्या स्वभावाप्रमाणे गर्दीत मागे एका बाजूला सर्वांची नजर चुकवून उभा होतों. तूं मजकडे पाहिलेंस आणि हसलीस. किती गोड— किती मधुर स्मित केलेंस ! माझ्या हृदयसागराला आनन्दाची भरती आली. आपल्या उच्चासनावरून उठून हसगतीने मजकडे येऊं लागलीस. माझ्यापुढची गर्दी एकदम दुभङ्गली. मी तुझ्या सम्मुख उभा होतों, तूं मजजवळ आलीस आणि मी आपलें मस्तक विनम्र केलें. तूं आपल्या सुकुमार हाताने माझा हात धरलास. मी मन्त्रमुग्ध होऊन तुझ्या मागोमाग चालू लागलों.

तूं थेट आपल्या आसनापर्यन्त मला नेलेंस आणि मला आपल्या अर्ध्या आसनावर बसविलेंस. तूंही मजजवळ बसलीस. माझें भाग्य फळाला आलें. मी आनन्दातिशयाने वेडा होतों कीं काय, असें मला वाटूं लागलें. तूं हसलीस. माझ्या हातावरून आपला कमलदलासारखा कोमल हात फिरवून तूं माझ्या बावरलेल्या अन्तःकरणाला धीर दिलास.

' आता कसं बरं वाटलं ? 'अर्धवट नेत्र मिटून हसत मला म्हणालीस. मी आनन्दरसांत बुडून गेलों !

तुझ्या कृतीने सारा दरबार आश्चर्यचकित झाला. आश्चर्याची पहिली लाट ओसरली आणि प्रत्येकाच्या नेत्रांत आणि मुखावर क्रोधाची छटा दृग्गोचर होऊं लागली. सारा दरबार खवळून गेला.

' पाहतां काय ? ओढा त्याला खाली ! '

' चोर कुठला ! भिकारी ! दरिद्री ! '

' पहा, त्याच्या अङ्गावर कांही कळा तरी दिसते का ? '

' हाणा ! ठोका ! द्या गावाबाहेर हाकलून ! '

सर्व बाजूंनी प्रतिध्वनि होऊं लागले. मागून पुढून लोक धावून आले आणि माझ्यावर एकच हल्ला चढविला. मला वाचविण्यास तूं पुढे झालीस, त्या वेळीं आईच्या मायेने तूं मला पाठीशीं घातलेस. पण एकाने तुला खस्कन् बाजूस ओढून काढलें आणि मी तत्काळ बेशुद्ध होऊन पडलों.

दुसरे दिवशीं सकाळची वेळ !

मीं डोळे उघडून पाहिलें, तों मी एका अरण्यांत पडल्याचें मला आढळून आलें. माझें सारें अङ्ग ठेचून निघालें होतें, मस्तक फुटलें होतें. दरबारचा सारा प्रसङ्ग आठवूं लागला आणि दुक्खातिशयाने माझें मस्तक भ्रमूं लागलें. मी उठण्याचा प्रयत्न केला; पण मला उठतां येईना. तुझी करुण मूर्ति डोळ्यांपुढे आली. तुझ्या नितळ मानेवरील विकळ केशकलाप, दुक्खावनत मुखावरील उदास छटा, निमीलित लोचनांतून पाझरणारे सान्द्र असहाय्य भाव, अन्तःकरणाची व्याकुलता व्यक्त करणारा भालप्रदेशावरील वाम हस्त–या दृश्याने मी अधिकच दुक्खी झालों. पण अशा दुक्खांतही तुझ्या या सहानुभावाने मला समाधान वाटलें आणि मी मान टाकली.

ल्हानपणीं तूं भारीच हूड नि खेळकर होतीस. दाण्डगाई आणि मारामारी या तुझ्या आवडत्या गोष्टी. यामुळे तुला सर्वांचीं बोलणीं खावीं लागत. मी दृष्टीस पडतांच तुझी कळी खुलून तूं एकदम मजकडे धाव घेत होतीस. मन्दिरांतील चित्रांचीं वर्णनें मी तुला सांगू लागलों म्हणजे तुला आनन्द वाटे !

आणि तूं हसलीस म्हणजे मला अकारण समाधान वाटे. असेच दिवस गेले आणि तूं यौवनांत पदार्पण केलेंस. यौवनसहज लज्जेमुळे तूं मला परकी झालीस, तुझ्या सभोवती लोकांची गर्दी होती; पण तुझ्या हृदयांत एकलेपणाची आग पेटलेली होती.



एके दिवशीं मी न कळवितां तुझ्या मन्दिरांत प्रवेश केला. तूं खिडकीशेजारीं बसून माझाच काव्यसङ्ग्रह वाचीत होतीस. माझी चाहूल ऐकतांच तूं भानावर आलीस आणि मागे वळून पाहिलेंस तों मी ! तूं किती आश्चर्यचकित झालीस ! पदर सावरण्याचेंही तुला भान नव्हतें. विस्फारित नेत्रांनी तूं मजकडे पहात होतीस.

मी तुजजवळ आलों आणि धिटाईने तुझी हनुवटी वर

उचलली. तुला किती आनन्द झाला. डोळे भरून तूं मजकडे पाहूं लागलीस. मी तुझे हात माझ्या हातांत घेतले.

तूं मुलखाची लाजरी अन् भितरी, पण तेव्हा किती धीट झालीस ?


माझ्या छातीवर मस्तक टेकवून तूं मला आपल्या कोमल बाहूंचा विळखा घातलास. तुझ्या अलकभाराच्या मत्त गन्धाने मी धुन्द झालों. विश्व नव-चैतन्याने भरल्याचा मला भास झाला.

मी तुझा निरोप घेण्याकरिता आलों होतों; पण माझे शब्द ओठांतल्या ओठांत विरून गेले.

माझ्या धिटाइने– अतिप्रसङ्गाने–तूं क्रुद्ध व्हावेंस आणि माझा अपमान करून मला दुःशब्दाने ताडण करावेंस, अशी माझी फार इच्छा होती. मग माझ्या हृदयाला शान्तीचा लाभ झाला असता आणि परदेशांत मी सुखाने काळ क्रमिला असता.


पण तूं मला आपल्या प्रेमपाशांत बद्ध केलेंस आणि माझे सर्व मनोरथ ढासळून टाकलेस. माझ्या हृदयाला परदेशीं वास्तव्य करीत असतां आता समाधान कसें प्राप्त होणार ?

प्रेमाची फुङ्कर घालून माझ्या हृदयांतील वन्हि कशाला हा प्रदीप्त केलास ?



'प्रेम म्हणजे मरीचिका !

दुरून किती मोहक दिसतें! इतके दिवस सोसलेल्या दुक्खाचें सार्थक होणार–आतापर्यन्त केलेल्या कल्पनातीत कष्टांना आता फलप्राप्ति होणार–या कल्पनेपासून जो आनंद वाटतो त्यांतच खरें सुख आहे. '



किती आवेशाने व आत्मविश्वासाने तो बोलत होता. त्याच्या एकेका शब्दाने माझें हृदय मात्र खचत होतें.

आपल्या भरदार बुचड्यावर मोगऱ्याचीं फुलें माळून हातांत पूजापात्रें घेऊन तूं बाहेर–मन्दिराकडे जाण्याच्या तयारींत होतीस. मी आलों आणि तुझ्यामागे हळूच येऊन उभा राहिलों. तुझ्या अलकभारांतील एक फूल मी हळूच काढून घेतलें, तोंच गोड सम्भ्रमाने तूं तोण्ड फिरविलेंस– लाजलीस नि खाली मान घातलीस. मला किती आनन्द झाला !

' प्रेम म्हणजे मरीचिका!' माझ्या मित्राने ठासून उच्चारलेले शब्द माझ्या मनाच्या पोकळींत घुमले आणि मी एकदम चमकलों !

स्मृतिचित्रेंच हीं !

स्वप्नमय वातावरणांत विहार करीत असतां विविध भावरङ्गांत हृदयशलाकेने रेखाटलेलीं हीं स्मृतिचित्रें; पण आज त्यांना मरीचिकेचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

सत्य हें क्वचित्प्रसङ्गीं कल्पनेलाही अगम्य व अतर्क्य असतें.

तुझा-माझा किञ्चित्कालचा सहवास हेंच त्याचें प्रत्यक्ष उदाहरण. निष्प्रेम आयुष्यांत हृदयांना स्वारस्य वाटलें नाही. आपल्या सहजीवनांत आनन्द उत्पन्न व्हावा म्हणून प्रेमाचा जन्म झाला; पण आता हेंच प्रेम माझ्या दुक्खाला कारण झालें आहे !

एकाच हिन्दोळ्यावर बसून आपण झोके घेत होतों. आकाशांत विजेची वेल बहरली. गळ्यांत बाहूंचे हार घालून चवड्यांनी झोके उंच उंच चढविले. वर जाऊन उल्काफुलें वेचलीं. प्रेमाच्या कानगोष्टी केल्या. फुलासारखें जीवन आहे, असें आपणांस वाटलें. आकाशांतून प्रत्यक्ष पृथ्वीवर आलों. परिस्थितीच्या प्रखर तापाने साऱ्या उल्काफुलांनी पाषाणाचीं रूपें घेतलीं.

स्वप्नें विरलीं ! आकाङ्क्षा थिजल्या !!

आणि आज दोघांचे मार्ग इथून भिन्न झाले.

या गतस्मृति माझ्या दुक्खपूर्ण मानससरोवरांत आनन्दाच्या लहरी उत्पन्न करतात.

आपली ताटातूट होतांना प्रेमाची खूण म्हणून मरीचिकारूपाने हीं आपलीं स्मृतिचित्रें तुला अर्पण करीत आहें.

विसावा

REFBK-0005425